# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. २१ जुलै २०२५

किंमत ४ ₹


## प्रशांत महासागरात भूकंपाचा तडाखा

**रशिया :** रविवार, २० जुलै २०२५ रोजी रशियाच्या पॅसिफिक किनाऱ्याला भूकंपांनी जोरदार तडाखा दिला. या दरम्यान अनेक भूकंप झाले आणि रशीयाला त्सुनामीचा इशारा देण्यात आला. पेट्रोपाव्लोव्स्क-कामचत्स्कीजवळ ७.४ तीव्रतेचा मोठा भूकंप झाला. यूएसजीएसने त्सुनामीचा धोका वर्तवला आहे.रशियाच्या पूर्वेकडील कामचत्स्कीजवळच्या भागात ६.६ तीव्रतेचा आणखी एक भूकंप झाला. जर्मन रिसर्च सेंटर फॉर जिओसायन्सेसने ही माहिती दिली. भूकंपाचे केंद्र जमिनीपासून फक्त १० किलोमीटर खाली होते. त्यामुळे भूकंपाचा प्रभाव जास्त जाणवला. भूकंप उथळ असल्याने मोठे नुकसान झाले नसावे. पण, लोकांना जोरदार धक्के जाणवले.

## अमृतसरमध्ये ८० कोटींचे हेरॉइन जप्त

**अमृतसर :** पंजाबमध्ये ड्रग्ज तस्करीविरुद्धच्या मोहिमेला आज मोठे यश मिळाले आहे. अमृतसरच्या चेहरता परिसरात नार्कोटिक्स टास्क फोर्सने एका तरुणाला १५ किलो ४०० ग्रॅम हेरॉइनसह अटक केली आहे. जप्त केलेल्या हेरॉइनची आंतरराष्ट्रीय बाजारात किंमत सुमारे ८० कोटी रुपये असल्याचा अंदाज आहे. अटक केलेल्या आरोपीचे नाव प्रभजीत सिंग असे आहे. तो अमृतसरमधील मोडे गावातील रहिवासी आहे. तो ड्रोनद्वारे पाकिस्तानातून मागवलेले हेरॉइन घेऊन स्विफ्ट कारमधून अमृतसरला जात होता.वाटेत पोलिसांनी गाडी थांबवली आणि झडती दरम्यान मोठ्या प्रमाणात हेरॉइन जप्त केले.

# जेएसडब्ल्यूचा 7/12 रद्द

## सरकारच्या नावे सातबारा पुनर्स्थापित

। अलिबाग । प्रतिनिधी ।


**अलिबाग तालुक्यातील जुई बापूजी येथील सरकारी स.नं. ५०/ड या सरकारी कांदळवनयुक्त जमिनीचा सातबारा रद्द करून तो जेएसडब्ल्यु कंपनीच्या नावे करण्यात आला होता. अलिबाग येथील सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत, व्दारकानाथ पाटील व वन विभागाच्या पाठपुराव्यानंतर आता सदरचा सातबारा पुनर्स्थापित करण्यात आला असून या जमिनीचा सातबारा पुन्हा सरकारच्या नावे करण्यात आला आहे.**

जिल्हा न्यायालयामध्ये अलिबाग तालुक्यातील जुई बापूजी येथील सरकारी स.नं. ५०/ड या सरकारी कांदळवनयुक्त जमिनीवरील जेएसडब्ल्यू स्टील या कंपनीच्या अतिक्रमण व कांदळवन तोडीचा खटला न्यायालयात प्रलंबीत असताना तत्कालीन तहसिलदार अलिबाग यांनी दि.३ जून २०२१ च्या आदेशाने जेएसडब्ल्यू कंपनीच्या अर्जावरून सरकारी राखीव कांदळवन जमीन वनविभाग व जिल्हाधिकारी रायगड यांना अंधारात ठेवून चक्क जेएसडब्ल्यू कंपनीच्या नावे केली होती. तसा सातबाराही कंपनीच्या नावे करण्यात आला होता. तहसीलदार अलिबाग यांचे हे आदेश चार महिने कोणत्याच वरिष्ठ कार्यालयाला माहित नव्हते. अलिबाग येथील सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांना याबाबत माहिती मिळताच त्यांनी दि. १३ सप्टेंबर २०२१ रोजी अलिबागचे उप वन संरक्षक यांची भेट घेवून कांदळवनाची जमिनीचे रक्षण करण्यासाठी वन विभागाने त्वरील अपील दाखल करावे असे लेखी पत्र दिले होते. अशाच प्रकारचे पत्र शहाबाज येथील शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष व्दारकानाथ पाटील यांनीही अलिबागचे प्रांत यांना ग्रामस्थांमार्फत देवून कांदळवनाच्या जमिनीचे रक्षण करण्याची मागणी केली होती. त्यानंतर वन विभागामार्फत या प्रकरणामध्ये अपील दाखल करण्यात आले.

या अपीलाचा निर्णय देताना अलिबागचे तत्कालीन प्रांत अधिकारी प्रशांत ढगे यांनी त्यांना प्राप्त अधिकारानुसार तहसिलदार अलिबाग यांचा दि.३ जून २०२१ चा आदेश दि. १४ फेब्रुवारी २०२३ च्या आदेशाने रद्द केला होता. त्यामुळे कांदळवनाची

•> पान २ वर

**शासकीय जमीन लाटण्याचा प्रयत्न जेएसडब्ल्यू कंपनीने केला होता. त्यासाठी कंपनीने अर्थपूर्ण घडामोडींना चालना दिल्याची चर्चा सर्वत्र होती. जमीन शासनाची आहे हे माहिती असून देखील अलिबागच्या तत्कालीन तहसीलदारांनी ती जमीन जेएसडब्ल्यूच्या नावे करुन देण्यामागे कोणते निकष लावले होते, हे तपासण्याची वेळ आली आहे. अशी चुकीची नोंद करणाऱ्या अधिकाऱ्यांवर सरकार कारवाई करणार का? असा संतप्त सवाल नागरिकांमधून विचारला जात आहे.**



डावीकडे जेएसडब्ल्यूच्या नावे असलेला सातबारा तर उजवीकडे सरकारच्या नावे पुनर्स्थापित झालेला सातबारा

# शेतकरी हमीभावाने त्रस्त; कृषी मंत्री 'रमी'मध्ये व्यस्त

। मुंबई । वृत्तसंस्था ।

राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे हे त्यांच्या वादग्रस्त विधानांमुळे अनेकदा वादात अडकले आहेत. आता विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन नुकतेच संपले असून या अधिवेशनात ते सभागृहातच मोबाईलवर रमी गेम खेळत असल्याचा एक व्हिडीओ समोर आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी हा सदर व्हिडीओ एक्सवर शेअर केला होता.

एकीकडे राज्यातील शेतकरी दुष्काळाच्या खाईत आणि कर्जाच्या डोंगराखाली दडपून त्रस्त असल्याचे चित्र असताना दुसरीकडे राज्याचे कृषिमंत्री मोबाईलवर रमी गेम खेळण्यात व्यस्त असल्याचे पाहावयास मिळाल्याने बळीराजाने आपल्या व्यथा कुणाकडे मांडायच्या असा यक्ष प्रश्न शेतकऱ्यांसमोर आहे. या घटनेवरुन सर्वच विरोधी पक्षांकडून कोकाटे यांच्यावर टीका होताना दिसत आहे. शेतकरी कामगारपक्षानेदेखील कृषीमंत्र्यांच्या सभागृहातील मोबाइलवर रमी गेम खेळण्याच्या प्रकाराचा निषेध केला आहे.

सत्तेतल्या राष्ट्रवादीला कुठलीही गोष्ट भाजपला विचारल्याशिवाय करता येत नाही. सध्या राज्यात शेतीचे असंख्य प्रश्न प्रलंबित आहेत. त्यासोबतच राज्यात दररोज आठ शेतकरी आत्महत्या करत असून तरीदेखील यांना निर्णय घेता येत नाही. कारण प्रत्येक गोष्ट भाजपला विचारावी लागते. त्यामुळे आता हातात काहीच काम शिल्लक नसल्याने कृषीमंत्री माणिकराव कोकाटे सभागृहात बसून रमी खेळत असल्याची खोचक टीका रोहित पवार यांनी केली आहे. कृषीमंत्री महाराष्ट्रात जुगाराचं पिक पेरण्यात व्यस्त आहेत. त्यांची फळं महाराष्ट्रातील तरुण पिढी आणि बळीराजा भोगत आहे.

•> पान २ वर

> **राज्यात कर्जमाफीचे आश्वासन देऊनही त्याची पुर्तता करण्यात आली नाही. सरकारच्या या भूमिकेबाबत शेतकरी प्रचंड नाराज आहेत. सभागृहातील या प्रकारामुळे कृषीमंत्री गांभीर्याने घेत नसल्याचे दिसून येत आहे . राज्याला अभ्यासू व शेतकऱ्यांबद्दल आस्था असणारा मंत्री असणे आवश्यक आहे. त्यामुळे कोकाटे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी होत आहे.**
>
> 
>
> **– जयंत पाटील, शेकाप सरचिटणीस**

## अखेर सौदीच्या राजकुमाराचं निधन

**नवी दिल्ली :** सौदी अरेबियाचे राजकुमार अलवलीद बिन खालिद बिन तलाल यांचा वयाच्या ३६ व्या वर्षी मृत्यू झाला. द स्लीपिंग प्रिन्स या नावाने प्रसिद्ध असलेले राजकुमार अलवलीद हे १५ वर्षांचे असताना लंडन येथे एका कार दुर्घटनेनंतर कोमात गेले होते. त्यानंतर जवळपास दोन दशक ते कोमामध्ये होते. कोमात असतान त्यांचा मृत्यू झाला. सुमारे २० वर्ष ते रियाध येथे लाइफ सपोर्टवर होते. या काळात त्यांना एकदाही शूद्ध आली नाही. राजकुमार अलवलीद बिन खालिद यांचे वडील प्रिन्स खालेद बिन तलाल बिन अब्दुलअझीझ यांनी त्यांच्या मुलाच्या निधनाची बातमी दिली. राजकुमार अलवलीद बिन खालिद बिन तलाल यांचा जन्म १८ एप्रिल १९९० मध्ये झाला होता.

## पुनर्वसनासाठी जेएनपीएची जहाजे रोखणार

### शेवा कोळीवाड्यातील महिला आक्रमक

। उरण । वार्ताहर ।

कोळीवाडा ग्रामस्थांनी पुनर्वसनाच्या मागणीसाठी जानेवारीमध्ये जेएनपीए बंदरातील मालवाहू जहाजे बंद केल्यानंतर केंद्रीय बंदर मंत्री सरबानंद सोनोवाल यांनी कॅबिनेटची मंजूरी घेवून जेएनपीए कडून जमीन देण्याचे दिलेले आश्वासन पूर्ण केलेले नाही. ते पूर्ण करणार असल्याचे लेखी आश्वासन जेएनपीए अध्यक्षांच्या माध्यमातून मालमत्ता विभागाच्या व्यवस्थापकांकडून दिले होते.

याची जुलै उजाडला तरी अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटनेने येत्या स्वातंत्र्य दिनी चौथ्यांदा जेएनपीए चॅनल बंद आंदोलनाचा इशारा दिला आहे.

जेएनपीए बंदराच्या उभारणीसाठी १९८५ ला शेवा कोळीवाडा गावाचे विस्थापन केले होते. या संपूर्ण गावाला वाळवीने पोखरले आहे. त्यामुळे येथील नागरिकांना धोकादायक घरात आपल्या कुटुंबासह जीवन जगावे लागत आहे. विस्थापित झाल्यानंतर आज पर्यंत चार पिढ्या आशा स्थितीत वास्तव्य करीत आहेत. यात धोकादायक निवाऱ्या सह विस्थापितांच्या रोजगाराचाही प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे नागरिकांकडून संताप व्यक्त

•> पान २ वर

## तळोजा कारागृहात कैद्यावर हल्ला

**नवीन पनवेल :** तळोजा कारागृहात बंदीस्त असलेल्या मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी शामिल साकिब नाचण आणि इरफान मुस्तफा लांडगे या दोघांनी मोक्कांतर्गत कैदेत असलेल्या गिरीश कुमारन नायर याच्यावर रंगकाम करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पत्र्याच्या सहाय्याने हल्ला केल्याची घटना घडली. या हल्ल्यात नायर जखमी झाला आहे. या घटनेनंतर खारघर पोलिसांनी दोन्ही हल्लेखोर आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे. मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी शामिल साकिब नाचण आणि इरफान मुस्तफा लांडगे तसेच जखमी गिरीष नायर असे तिघेही तळोजा कारागृहातील

•> पान २ वर

# कोकणावर फडणवीस सरकारची वक्रदृष्टी

### उद्धव ठाकरे गट शिवसेनेचे माजी खासदार विनायक राऊत यांचा आरोप

। सावंतवाडी । वृत्तसंस्था।

महाराष्ट्र शासनाने कोकणातील ५ जिल्ह्यांमधील ५९३ गावांवर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्याचा नवीन शासन निर्णय १९ जून २०२५ रोजी काढला आहे. या निर्णयावरून उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे नेते तथा माजी खासदार विनायक राऊत यांनी याला जोरदार विरोध दर्शवला आहे. सावंतवाडी येथील पत्रकार परिषदेत बोलताना राऊत यांनी, हा निर्णय कोकण गिळंकृत करण्याचा आणि परप्रांतीय भूमाफियांना मोक्याच्या जमिनी सुपूर्द करण्याचा डाव असल्याचा गंभीर आरोप केला.



यापूर्वी सिडको प्राधिकरणाच्या माध्यमातून कोकणातील ४८८ गावांमध्ये सिडकोची नियुक्ती करण्याचा प्रयत्न झाला होता, मात्र जनतेच्या तीव्र विरोधामुळे तो प्रस्ताव मागे घेण्यात

•> पान २ वर

## मान्सून पुन्हा सक्रिय होणार

। रायगड । प्रतिनिधी ।



गेल्या आठवड्यात पावसाने राज्यातील अधिकांश भागात विश्रांती घेतली. आता पुन्हा एकदा मान्सून सक्रिय होत आहे. भारतीय हवामान खात्याने राज्यात मान्सून सक्रिय होत असल्याचे संकेत दिले आहे. राज्यातील अधिकांश जिल्ह्यात आजपासून २५ जुलै पर्यंत जोरदार पावसाचा अंदाज दिला आहे. राज्यात अनेक ठिकाणी तापमानाचा पारा ३५ अंशाच्या जवळ पोहोचला आहे. अशातच आता हवामान खात्याने पुन्हा एकदा पाऊस सक्रिय होत असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे उकाड्यापासून दिलासा मिळणार आहे. हवेचा दाब कमी झाल्याने पावसासाठी पोषक वातावरण निर्माण झाले असून, सर्वाधिक जोर कोकण आणि विदर्भात

•> पान २ वर

# राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांची छावा कार्यकर्त्यांना मारहाण

। लातूर । वृत्तसंस्था ।

महाराष्ट्राचं राजकारण आता फार भयानक आणि विचित्र मार्गावर जाताना दिसत आहे. महाराष्ट्रातलं राजकारण राडेबाजी, दांडगाईच्या आणि अराजकतेच्या मार्गावर जाताना दिसत आहे. गेल्या आठवड्यात भर विधान भवनात राडा झाला. दोन आमदारांचे समर्थक भर विधान भवनात समोरासमोर आल्याची बातमी ताजी असताना लातूरमध्ये पुन्हा राड्याची घटना घडली आहे.



महाराष्ट्राचे दिवंगत ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण यांचा वारसा असल्याचा दावा करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या कार्यकर्त्यांनी छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांना अमानुषपणे मारहाण केली आहे. राष्ट्रवादीच्या मोठ्या गटाने प्रचंड शिवीगाळ करत लाथा-बुक्क्यांनी छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांना मारहाण केली. या मारहाणीचे व्हिडीओदेखील समोर आले आहेत. हे व्हिडीओ मन सुन्न करणारे आहेत. विशेष म्हणजे अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण हे स्वत: तिथे मारहाण करत होते.

राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा एक व्हिडीओ समोर आला आहे. विधीमंडळाच्या सभागृहात माणिकराव कोकाटे आपल्या मोबाईलमध्ये रम्मी खेळत असल्याचा व्हिडीओ समोर आला आहे. यावरुन विरोधकांकडून त्यांच्यावर टीकेचा झोड उठत आहे. तर दुसरीकडे माणिकराव कोकाटे यांनी मोबाईलवर आलेली ती जाहिरात होती तिला स्किप करत असतानाचं ते कुणीतरी कॅमेऱ्यात कैद केल्याचं स्पष्टीकरण दिलं आहे. पण याच घटनेचे राज्यभरात पडसाद पडताना दिसत आहेत. अजित पवार गटाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील

•> पान २ वर

### कोकणात जाण्यासाठी २५० गाड्या | गर्दी विभाजित करण्यासाठी रेल्वेचा निर्णय

# चाकरमान्यांसाठी गणेशोत्सवानिमित्त विशेष रेल्वे गाड्या

। रायगड । प्रतिनिधी ।

**दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सवानिमित्त मोठ्या संख्येने मुंबईतील कोकणवासियांनी कोकणात गावी जाण्याची तयारी सुरू केली आहे. प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी रेल्वेने गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाण्यासाठी २५० विशेष रेल्वेगाड्या चालवण्याचे नियोजन करण्यात आले आहे.**

कोकणात २७ ऑगस्ट रोजी गणेशोत्सव सुरू होत आहे. कोकणात जाण्यासाठी मुंबईतील कोकणवासियांची लगबग सुरू आहे. परंतु, एकाच वेळी मोठ्या संख्येने प्रवासी कोकणात जात असल्यामुळे प्रचंड गर्दी होते. त्यामुळे प्रवासादरम्यान असुविधा होते. ही गर्दी विभाजित करण्यासाठी मध्य आणि कोकण रेल्वे मार्गावर २५० विशेष रेल्वेगाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये सीएसएमटी सावंतवाडी सीएसएमटी दैनिक विशेष रेल्वेगाडी (४० फेऱ्या) गाडी क्रमांक ०११५१ विशेष रेल्वेगाडी सीएसएमटी येथून २२ ऑगस्ट ते १० सप्टेंबर या कालावधीत दररोज रात्री १२.२० वाजता सुटेल आणि सावंतवाडी रोड येथे त्याच दिवशी दुपारी २.२० वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०११५२ विशेष रेल्वेगाडी सावंतवाडी रोड येथून २२ ऑगस्ट ते १० सप्टेंबर या कालावधीत दररोज दुपारी ३.३५ वाजता सुटेल आणि सीएसएमटी येथे दुसऱ्या दिवशी पहाटे ४.३५ वाजता पोहोचेल.सीएसएमटी रत्नागिरी-सीएसएमटी दैनिक विशेष रेल्वेगाडी (३६ फेऱ्या) असणार आहेत. गाडी क्रमांक ०११५३ विशेष रेल्वेगाडी सीएसएमटी येथून २२ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत दररोज सकाळी ११.३० वाजता सुटेल आणि रत्नागिरी येथे त्याच दिवशी रात्री ८.१० वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०११५४



•> पान २ वर


## ॥ तृतीय पुण्यस्मरण ॥

॥ मातृ पितृ देवो भवः ॥







**कै. डॉ. जनार्दन मल्हारी पाटील**

मृत्यू : दि. २४ जुलै २०२२ (कामिका एकादशी)
मु. वाघ्रण, पो. नारंगी, अलिबाग-रायगड

तुमच्या जाण्यानं घराचं घरपण हिरावून गेलं
कधी न संपणारं दुःख मनामध्ये राहून गेलं
तुमचे शब्द, तुमचा आवाज आणि तुमच्या आठवणी
वेळोवेळी घेऊन येतात डोळ्यात आमच्या पाणी...

स्मरणकर्ते

**हिमसन परिवार**

शैला आत्माराम मल्हारी पाटील, चंदा गणेश मल्हारी पाटील, रेखा कृष्णकांत मल्हारी पाटील, प्रेमा जनार्दन पाटील (बहिण), राहुल आत्माराम पाटील, भक्ती गणेश पाटील, मिहीर कृष्णकांत पाटील

भाचे : संजय जनार्दन पाटील,अजय जनार्दन पाटील, राजेश जनार्दन पाटील, निनाद मधुसूदन ठाकूर, तेजल प्रमोद कडू, निखीला मधुसूदन ठाकूर, संतोष विष्णू पाटील **समस्त पाटील, गावंड परिवार.**

तिथीनुसार सोमवार, दि. २१ जुलैं २०२५

# पोलिसांकडून वाहनचालकांना शिस्तीचे डोस

। माथेरान । वार्ताहर ।

नेरळ माथेरान घाट रस्त्यावर वीकेंडला होणाऱ्या वाहतूक कोंडीतून पर्यटकांची सुटका करण्यासाठी नेरळ पोलिसांकडून बेशिस्त वाहन चालकांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. परंतु कारवाईचे कारण न समजताच अचानक आज पोलिसांनी कारवाई केल्याने टॅक्सी चालक युनियनने पोलिसांच्या विरोधातच स्ट्राइक सुरू केल्याने मधल्या मध्ये माथेरान फिरण्यासाठी आलेल्या पर्यटकांचे हाल झालेत.दरम्यान दुपारी तीन वाजता पोलीस प्रशासन आणि टॅक्सी युनियन मधील सुवर्णमध्य काढीत पुन्हा नेरळ माथेरान नेरळ सेवा सुरू झाल्याने पर्यटकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला.



जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ असणाऱ्या माथेरान येथे मान्सून मध्ये पर्यटकांची मांदियाळी पाहायला मिळत आहे. येथील हिरवी वनराई, फेसाळणारे धबधब्याचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांची शनिवार रविवार विकेंड सुट्टीला गर्दी पाहायला मिळत आहे.परतू माथेरान मध्ये येणाऱ्या पर्यटकांच्या वाहन कोंडीमुळे पर्यटकांना पायपीट करावी लागली. माथेरान घाटात वाहतूक कोंडी होत आहे.परिणामी याचा फटका पर्यटनावर होत असून पर्यटकांना नाहक त्रास सहन करावा लागतो.

दरम्यान घाटातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी नेरळचे पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे यांनी आज बेशिस्त वाहन चालकांवर कारवाईचा बडगा उगारला. ३० हून अधिक कार चालकांवर केलेल्या कारवाईमुळे कुठे तरी वाहन चालकांनीदेखील केवळ आमची चुकी नसून वीकेंडला पोलीस घाटात उपस्थित राहत नसल्याने पर्यटकांची वाहने ही घाटात पार्क केलेली असल्याने याचा फटका स्थानिक चालकांना बसतो.

त्याकडे पोलीस का लक्ष देत नाही म्हणून थेट आज रविवार सुट्टीच्या दिवशी टॅक्सी युनियनकडून वाहतूक सेवा बंद करून पोलीस ठाण्याच्या समोर २०० वाहन चालकांनी घेराव घातला. अखेर पोलिसांकडून देण्यात आलेल्या सूचना यामध्ये, वाहन चालक मद्यपान करून वाहन चालवणार नाही, शिवाय गर्दीत एकापाठोपाठ वाहने रांगेत लागतील आणि ड्रेस कोड बंधनकारक असेल म्हणून एक महिन्याची मुदत देण्यात आली. यावर सुवर्णमध्य करीत टॅक्सी युनियननेदेखील सकारात्मकता दाखवत आपले आंदोलन मागे घेत पर्यटकांच्या सेवेत आपली वाहने सुरू केली.

### वाहनचालकांचे आंदोलन; पर्यटकांचे बेहाल

आज रविवार वीकेंडला सकाळपासून वाहन चालकांचे स्ट्राईक सुरू झाल्याने पर्यटकांचे नाहक हाल झाले. माथेरान उतरण्यासाठी पर्यटकाना चालत नेरळ यावे लागले तर माथेरान फिरण्यासाठी आलेल्या आज पर्यटकाना पायी घाट चढावा लागला.हातात सामान आणि लहान मुले खांद्यावर घेऊन ही पायपीट करावी लागली.दुपारी तीन वाजता पोलीस आणि चालकांचा गोंधळ मिटल्याने वाहनचालक पर्यटकांना घेऊन माथेरान उतरू लागले. मात्र आज दोघांच्या भांडणात पर्यटकांचा नाहक घामटा निघाला.

# ओसाड जमिनीत आदिवासींकडून लागवड

। उरण । वार्ताहर ।

नापिकीमुळे शेतकऱ्यांनी ओसाड ठेवलेल्या जमिनीवर आदिवासींनी भात लागवड करीत शेतीचे महत्व सिद्ध केले आहे. उरण मधील वाढती मजुरी, मजुरांचा अभाव आणि निसर्गाच्या अनियमितपणा यामुळे बहुतांशी शेतकऱ्यांनी शेतीकडे दुर्लक्ष केले आहे. यात तरुणांना शेतीची ओढ नाही. त्यामुळे या जमिनी ओसाड पडल्या होत्या. मात्र आदिवासी बांधवांनी ओसाड शेत जमिनीत भातरोपांची लागवड करून या ओसाड जमिनी लागवडीखाली आणल्या आहेत.

पोटाची भूक भागविणाऱ्या काळ्या आईला महत्व देऊन, या ओसाड जमिनीत भात लागवड करून चिरनेर परिसरातील आदिवासी बांधवांनी समाजातील शेतकऱ्यांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. वर्षाचे बारा महिने मोलमजुरी करून पोटाची खळगी भरणारा हा समाज अलीकडे विकासाच्या मुख्य प्रवाहात येत असून, त्यांना अन्नाचे महत्त्व काय असते हे समजले आहे.

दरम्यान चाणजे येथील शेतकरी ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या शेतावर आदिवासी बांधवांच्या कृतीतून, पट्टा पद्धतीने भात लागवड करून, आदिवासी बांधवांना उरणच्या कृषी अधिकाऱ्यांनी पट्टा पद्धतीच्या लावणीचे व चारसूत्री लावणी पद्धतीचे महत्त्व पटवून दिले आहे.

पान १ वरून

## शेतकरी हमीभावाने त्रस्त; कृषी मंत्री 'रमी'मध्ये व्यस्त

महाराष्ट्र विधानसभेचा बहुमुल्य वेळ मंत्री महोदय सत्कारणी लावताना पाहून राज्याची खूपच प्रगती झाली आहे असे वाटत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी लवकरच या मंत्र्यांना आता काम नसल्यामुळं घरी बसवायला हरकत नाही, अशी टीका मनसेचे नेते यशवंत किल्लेदार यांनी माणिकराव कोकाटे यांच्यावर केली आहे.

मी विधानपरिषदेत कामकाजासाठी बसलो होतो. तेव्हा सभागृह काही वेळासाठी तहकूब झाले असावे. म्हणून मी खालच्या सभागृहात काय कामकाज सुरू आहे, हे पाहण्यासाठी युट्यूबवर गेलो होतो. युट्यूबवर व्हिडीओ सुरू केल्यानंतर जाहिराती येत असतात. त्याप्रमाणेच त्यावेळी सदर जाहिरात आली. मी जाहिरात स्किप करून पुढे गेलो. पण व्हिडीओ व्हायरल करणाऱ्यांनी फक्त १८ सेकंदाचाच व्हिडीओ दाखवला, असे स्पष्टीकरण राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिले आहे.

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा विधानसभा सभागृहात मोबाईलवर रमी खेळतानाचा व्हिडिओ भरपूर व्हायरल होत आहे. एकीकडे शेतीमालाला हमीभाव नाही, शेतकरी आत्महत्या करत आहेत आणि दुसरीकडे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे मोबाईलवर रमी खेळत आहेत ही लाजिरवाणी गोष्ट आहे. महाराष्ट्राची संस्कृती ही शेतीशी घट्ट जोडलेली आहे, वारंवार शेतकऱ्यांच्या श्रमाचा अपमान करणारे, शेतकऱ्यांबद्दल आपुलकी नसलेले कृषीमंत्री कोकाटे यांचा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत असल्याचे शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा नृपाल पाटील यांनी सांगितले.

## कोकणावर फडणवीस सरकारची वक्रदृष्टी

आला होता. आता १९ जून २०२५ रोजी नगरविकास खात्याने पुन्हा नवीन जीआर काढून ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यांमधील ५९३ गावांवर एमएसआरडीसीला विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त केले आहे. राऊत यांच्या मते, ही रस्ते बांधणारी कंपनी आता गावांचा कारभार पाहणार आहे, जे काम ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या माध्यमातून व्हायला पाहिजे. यामुळे ग्रामपंचायतींना दुय्यम ठरवून गावांचे गावपण आणि देवभूमीचे देवपण हिरावून घेण्याचा हा कट असल्याचा आरोप त्यांनी केला.

राऊत यांनी आरोप केला की, या जीआरमागे कोकणातील जमिनी हडपण्याचा आणि परप्रांतीय भूमाफियांना सोयीसुविधा पुरवण्याचा हेतू आहे. किनारपट्टीचा ९५ टक्के भाग, सह्याद्री पट्ट्यातील आणि दोडामार्गसारखे काही भाग परप्रांतीयांच्या ताब्यात गेल्याचे उदाहरण त्यांनी दिले. एमएसआरडीसीवर रस्ते बांधकामात कोट्यवधींच्या भ्रष्टाचाराचा आरोप करत, शक्तीपीठ महामार्गाचे उदाहरणही त्यांनी दिले. या निर्णयामुळे गावांवर विविध आरक्षणे लादली जातील आणि ग्रामपंचायती बरखास्त करण्याचा हा कट असल्याचा दावा राऊत यांनी केला.राऊत यांनी कोकणवासीयांना या जीआरला गावोगावी कडाडून विरोध करण्याचे आवाहन केले. सरपंचांनीही गावांच्या हिताचा विचार करून यावर भूमिका घ्यावी, असे ते म्हणाले. सावंतवाडी तालुक्यातील निरवडे, वेत्ये, इन्सुली, तळवडे, वाफोली, सोनुर्ली, निगुडे, बांदा, शेर्ले, रोणापाल, पाडलोस, मडूरा, कास, पेंडूर यांसारख्या गावांमध्ये एमएसआरडीसी काम करणार का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. सिडकोप्रमाणेच या जीआरलाही तीव्र विरोध करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कोकणातील स्थानिक लोकप्रतिनिधी भूमी रक्षणाबाबत उदासीन असल्याचा आरोपही राऊत यांनी केला. अधिवेशन काळात हा मुद्दा चर्चेला येऊ नये म्हणून हा जीआर उशिरा अपलोड केल्याचा दावा त्यांनी केला. कोकणचे भले करायचे असेल तर कोस्टल रोड, मुंबई-गोवा महामार्ग आणि चिपी विमानतळ सुरळीत करा, असा टोलाही त्यांनी लगावला. गद्दार गटाचे नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नगरविकास विभागाने हा जीआर काढला आहे. कोकण गिळंकृत करायला आम्ही देणार नाही असा विश्वास राऊत यांनी व्यक्त केला.

या नवीन जीआरमुळे कोकणातील राजकीय आणि सामाजिक वातावरण तापण्याची शक्यता असून, आगामी काळात याविरोधातील आंदोलने तीव्र होण्याची चिन्हे आहेत. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख बाबुराव धुरी, विधानसभा प्रमुख रूपेश राऊळ, वेंगुर्ले तालुका प्रमुख यशवंत परब, शैलेश गवंडळकर, शब्बीर मणीयार, गुणाजी गावडे आदी उपस्थित होते.

## जेएसडब्ल्यूचा ७/१२ रद्द

जमीन पुन्हा शासनजमा होण्याचा मार्ग मोकळा झाला होता. परंतु दि. १४ फेब्रुवारी २०२३ च्या आदेशालाही दोन वर्षे उलटली तरी सदरचा सातबारा जेएसडब्ल्यू कंपनीच्या नावेच दिसून येत होता. त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी पुन्हा या प्रकरणाचा पाठपुरावा सुरू केल्या नंतर अलिबागचे तहसिलदार विक्रम पाटील यांच्या आदेशाने अखेर ३ जुलै २०२५ रोजीच्या फेरफार क्र. ९६३ अन्वये मंडळ अधिकारी पोयनाड यांनी हा जेएसडब्ल्यू कंपनीच्या नावे असलेला सातबारा पुन्हा सरकारच्या नावे पुनर्स्थापित केला असल्याची माहिती सावंत यानी दिली आहे. कांदळवन जमिनीबाबत कोणताही निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या परवानगीशिवाय घेता येणार नाही, असे शासनाचे निर्देश असतानाही सरकारी कांदळवन जमीन जेएसडब्ल्यू कंपनीच्या नावे करण्याच्या महसूल खात्याच्या निर्णयाबद्दल स्थानिकांमधून संताप व्यक्त होत होता अशी प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी दिली आहे.

## राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांची छावा कार्यकर्त्यांना मारहाण

तटकरे हे सध्या मराठवाड्याच्या दौऱ्यावर आहेत. ते आज लातूरमध्ये दाखल झाले होते. ते लातूरमध्ये पत्रकारांशी संवाद साधत होते. याचवेळी भर पत्रकार परिषदेत छावा संघटनेते कार्यकर्ते तिथे आले आणि आक्रमक झाले. त्यांनी सुनील तटकरे यांच्याकडे माणिकराव कोकाटे यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली. विधीमंडळ हे जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी आणि कायदा करण्याचं सर्वोच्च सभागृह असल्याचं म्हणत छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सुनील तटकरे यांच्यासमोर पत्ते फेकले. यावेळी सुनील तटकरे यांनी शांतपणे त्यांच्याकडून निवेदन घेतलं. पण त्यानंतर मोठा राडा झाला.

सुनील तटकरेंची पत्रकार परिषद संपल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांना घेरलं. त्यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत मारहाण करायला सुरुवात केली. राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी छावाच्या कार्यकर्त्यांना लाथा-बुक्क्यांनी अमानुष मारहाण केली. छावाच्या कार्यकर्त्यांना रक्तबंबाळ करेपर्यंत ही मारहाण होती. विशेष म्हणजे राष्ट्रवादीचे युवा नेते सूरज चव्हाण हे स्वत: मारहाण करताना दिसत आहेत. एवढंच नाही तर व्हिडीओत काही कार्यकर्ते थेट खुर्ची भिरकावतानादेखील दिसत आहेत.

या मारहाणीच्या घटनेवर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अशी काही घटना घडली असेल तर ती अत्यंत चूक आहे. मी या घटनेचं समर्थन करणार नाही. मी अत्यंत शांततावादी कार्यकर्ता आहे. चर्चेतून, देवाणघेवाणमधून अनेक प्रश्न सुटत असतात. ते त्यांची भावना व्यक्त करण्यासाठी आले. मी शांतपणे ऐकून घेतलं. ही घटना निदनीय आहे. चूक घडली त्याबद्दल नाराजगी व्यक्त करतो. मी या घटनेचं समर्थन करणार नाही. मी आयुष्यात चुकीच्या गोष्टीचं समर्थन केलेलं नाही, अशी प्रतिक्रिया सुनील तटकरे यांनी दिली.

## मान्सून पुन्हा सक्रिय होणार

राहणार आहे. आज, २० जुलैला कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि कोल्हापूरच्या घाटमाथ्यांवर जोरदार सरींची शक्यता आहे. तसेच कोकणातील ठाणे, रायगड, मध्य महाराष्ट्रातील पुण्याचा घाटमाथा, सातारा, सांगली, पूर्व कोल्हापूर, सोलापूर, मराठवाड्यातील धाराशिव, लातूर आणि विदर्भातील सर्वच जिल्ह्यात विजांसह पावसाची शक्यता असल्याने सतर्कतेचा इशारा (येलो अलर्ट) आहे. उर्वरित राज्यात तुरळक ठिकाणी विजांसह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. तसेच कोकणासह मध्य महाराष्ट्र, मराठवाड्याच्या दक्षिणेकडील जिल्ह्यात आणि विदर्भात विजांसह पावसाची शक्यता असल्याने सतर्कतेचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. उर्वरित राज्यात विजांसह हलक्या सरींची शक्यता आहे. राजस्थानमध्ये तीव्र कमी दाबाचे क्षेत्र सक्रिय असून, ही प्रणाली निवळण्याची शक्यता आहे. मान्सूनचा आस असलेला कमी दाबाचा पट्टा त्याच्या सर्वसाधारण स्थितीवर असून, राजस्थानमधील कमी दाबाच्या केंद्रापासून फतेहगड, मुजफ्फराबाद, बंकुरा ते ईशान्य बंगालच्या उपसागरापर्यंत सक्रिय आहे. उत्तर बंगालच्या उपसागरात २४ जुलैपर्यंत कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याचे संकेत आहेत. शनिवारी सकाळपर्यंतच्या २४ तासांमध्ये कोकण, दक्षिण मध्य महाराष्ट्राच्या घाटमाथ्यावर जोरदार पाऊस कोसळला. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण येथे सर्वाधिक १४० मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भात तुरळक ठिकाणी मध्यम ते जोरदार सरी कोसळल्या आहेत. २२आणि २३ जुलैला कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांसह मध्य महाराष्ट्रातील कोल्हापूर आणि साताऱ्याच्या घाटमाथ्यावर मुसळधार पावसाची शक्यता आहे.

## चाकरमान्यांसाठी गणेशोत्सवानिमित्त विशेष रेल्वे गाड्या

विशेष रेल्वेगाडी रत्नागिरी येथून २३ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर या कालावधीत दररोज पहाटे ४ वाजता सुटेल आणि सीएसएमटी येथे त्याच दिवशी दुपारी १.३० वाजता पोहोचेल.सीएसएमटी सावंतवाडी सीएसएमटी दैनिक विशेष रेल्वेगाडी (३६ फेऱ्या) असणार आहेत. गाडी क्रमांक ०११०३ विशेष रेल्वेगाडी सीएसएमटी येथून २२ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत दररोज दुपारी ३.३० वाजता सुटेल आणि सावंतवाडी रोड येथे दुसऱ्या दिवशी पहाटे ४ वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०११०४ विशेष रेल्वेगाडी सावंतवाडी रोड येथून २३ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर या कालावधीत दररोज पहाटे ४.३५ वाजता सुटेल आणि सीएसएमटी येथे त्याच दिवशी दुपारी ४.४० वाजता पोहोचणार आहे. हे आरक्षण २४ जुलैपासून सुरू होणार आहे. गणपती विशेष गाड्यांचे आरक्षण २४ जुलै रोजीपासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि आयआरसीटीसीच्या संकेतस्थळावर विशेष शुल्कासह सुरू करण्यात येणार आहे. अनारक्षित डब्यांसाठी तिकीट आरक्षण अनारक्षित तिकीट प्रणालीद्वारे (यूटीएस) अतिजलद मेल एक्स्प्रेस गाड्यांसाठी लागू असलेल्या सामान्य शुल्कानुसार करता येईल.मुंबई, पुण्यावरून जाणाऱ्या एकूण १३८ विशेष रेल्वेगाड्याची सोय करण्यात आली आहे. त्यामध्ये दिवा चिपळूण मेमूच्या ३८ फेऱ्या धावतील. लोकमान्य टिळक टर्मिनस सावंतवाडी रोड दैनिक विशेष रेल्वेगाडीच्या ७२ फेऱ्या धावतील. लोकमान्य टिळक टर्मिनस सावंतवाडी रोड साप्ताहिक विशेष रेल्वेगाडीच्या ६ फेऱ्या धावतील. लोकमान्य टिळक टर्मिनस मडगाव साप्ताहिक विशेष रेल्वेगाडीच्या ४ फेऱ्या धावतील. लोकमान्य टिळक टर्मिनस मडगाव वातानुकूलित साप्ताहिक विशेष रेल्वेगाडीच्या ६ फेऱ्या धावतील.

## पुनर्वसनासाठी जेएनपीएची जहाजे रोखणार

केला जात आहे. शेवा कोळीवाडा ग्रामस्थांच्या पुनर्वसनासह विविध समस्या, प्रश्न प्रलंबित असल्याने शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटना करणार जेएनपीएचे बेमुदत चॅनेल बंद आंदोलन जाहीर केले आहे.कोळीवाडा गावाचे आधी पुनर्वसन करा त्यानंतरच बंदरांचा विस्तार करा अशी भूमिका घेत संतप्त ग्रामस्थांनी जेएनपीए समुद्र चॅनल रोखुन धरले होते. बंदराच्या समुद्री चॅनल परिसरात छोट्या मच्छीमार बोटी आडव्या टाकून हे आंदोलन सुरू केले होते. त्यामुळे सुरक्षा म्हणून बंदरात ये जा करणारी जहाजे बंद करण्यात आली होती. याचा परिणाम जागतिक स्तरावरील व्यापारावर झाल्याने याची दखल केंद्रीय बंदर मंत्री सारबनंद सोनेवाल व राज्याचे माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चर्चा करून जेएनपीए प्रशासनाकडून लेखी आश्वासन दिले होते.

जेएनपीटी बंदर उभारण्यासाठी हनुमान कोळीवाडा गावाची जमीन संपादन करून त्याचे उरण येथील बोरी येथे पुनर्वसन केले आहे. पुनर्वसन कायद्यानुसार १७ ऐवजी केवळ २ हेक्टर क्षेत्रातच २५६ कुटुंबाचे १९८५ साली पुनर्वसन करण्यात आले आहे. १९९२ ला हनुमान कोळीवाडा गावातील २५६ घरासह संपूर्ण गावाला वाळवीने पोखरले आहे. कमी भूखंडावर पुनर्वसन करण्यात आल्याने अनेक कुटूंब ही अशाही परिस्थितीत दाटीवाटीने वास्तव्य करीत आहेत.त्यामुळे १७ हेक्टर क्षेत्रावरच पुनर्वसन करण्याच्या मागणीसाठी मागील ४० वर्षांपासून संघर्ष सुरू आहे.या काळात आता पर्यंत ग्रामस्थ आणि व्यवस्थापन यांच्यात ५०० हून अधिक बैठका झाल्या मात्र हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सुटला नसल्याने ग्राम स्थांनी खास करून महिलांनी आक्रमक होत जेएनपीए विरोधात संघर्षच सुरु केला आहे.जेएनपीएने गावाच्या पुनर्वसनासाठी विकासित १०.५० हेक्टर जमीन देण्याचे मान्य केले आहे.त्याच्या मंजूरीचा प्रस्ताव गेल्या दोन वर्षांपासून केंद्र सरकारकडे प्रलंबित आहे. जेएनपीए बंदरात एकूण पाच खाजगी बंदर कार्यान्वित आहेत. या बंदरात आयात निर्यात करणारी जगातील २० पेक्षा अधिक जहाजे ये-जा करतात. बंदरातील जहाजे रोखल्यास याचा परिणाम जागतिक व्यापारावर होता. शेवा कोळीवाडा ग्रामस्थांनी आपल्या पुनर्वसनासाठी ४० वर्षे संघर्ष करीत आहेत. यात जानेवारी २०१२,२०२२ तसेच डिसेंबर २०२३ मध्ये जेएनपीए बंदरात जगातून येणारी व जाणारी मालवाहू जहाजे समुद्रात अडवून आंदोलन केले होते. आता पुन्हा एकदा अशाच प्रकारचे आंदोलन करण्याचा इशारा येथील महिलांनी दिला आहे.

## तळोजा कारागृहात कैद्यावर हल्ला

सर्कल - १ मधील वेगवेगळ्या बॅरेकमध्ये बंदिस्त आहेत. १८ जुलै रोजी दुपारी ३.१५ वाजण्याच्या सुमारास सर्व कैदी बॅरेक क्रमांक - १ मध्ये असताना शामिल नाचण आणि इरफान लांडगे या दोघांनी जुन्या भांडणाच्या वादातून मोक्कातंर्गत कैदेत असलेला आरोपी गिरीश नायर याच्यावर रंगकाम करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पत्र्याच्या सहाय्याने हल्ला करुन त्याला जखमी केले. या हल्ल्यात कैदी गिरीष नायर गंभीररित्या जखमी झाल्याने कारागृह पोलिसांनी त्याला तत्काळ रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. उपचारानंतर पुन्हा त्याला कारागृहात आणण्यात आल्याची माहिती तळोजा कारागृहाचे अधीक्षक प्रमोद वाघ यांनी दिली. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात आरोपी शामिल नाचण आणि इरफान लांडगे या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्याचेही वाघ यांनी सांगितले.

# शेतकऱ्यांचे परदेशात अभ्यास दौरे

। कोर्लई । वार्ताहर ।

शेतकऱ्यांचे परदेशात अभ्यास दौऱ्याचे आयोजन लवकरच शासनाच्या कृषी खात्याकडून होणार असल्याचे खात्रीलायक वृत्त असून केंद्र सरकारच्या पोर्टलवर आपण शेतकरी असल्याची नोंद करून घ्यावी,ज्यामुळे अभ्यास दौऱ्यात आपत्ती येणार नाही,तेव्हा आताच नोंदणी करावी, असे आवाहन कृषी मित्र रायगड भूषण प्रा.डॉ. जयपाल पाटील यांनी केले आहे.

यामध्ये शेतकऱ्यांचे ज्ञान आणि क्षमता उंचावण्यास देशाबाहेर सन २०२५-२६ योजना अंतर्गत राबवणार असुन युरोपला १२ दिवस, ईस्त्राईलला ९ दिवस, जपानला १० दिवस, मलेशियाला, व्हिएतनाम, फिलिपिन्स १२ दिवस, चीनला ८ दिवस, दक्षिण कोरीयाला १० दिवस येथील शेतकरी वर्गासोबत हितगुज, चर्चा, शेतकऱ्यांच्या संस्थाना भेटी, आधुनिक तंत्रज्ञान, व्यवस्थापन माहीती, आपल्या शेतीमालाची निर्यात या बाबीवर चर्चा भेटी देऊन देवाणघेवाण होणार आहे. या दौऱ्याचे नियोजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी केल्याबद्दल शेतकऱ्यांतर्फे आभार, शेतकऱ्यांची प्रगती म्हणजे राज्याच्या विकासात भर पडेल. यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी नोंदणी करावी. असे आवाहनही प्रा.डॉ.जयपाल पाटील यांनी केले आहे.



## शिमग्या म्हात्रे यांचे निधन

। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील कोप्रोली गावचे हापूस आंब्यांचे प्रसिद्ध व्यापारी शिमग्या म्हात्रे (९६) यांचे नुकतेच वृद्धपकाळाने निधन झाले आहे. कोप्रोली गावाचे अध्यक्ष मनोहर म्हात्रे यांचे ते पिताश्री होते. त्यांच्या पश्चात चार पुत्र, चार विवाहित मुली, सुना, जावई, नातवंडे असा आप्त परिवार आहे.



आंबा आणि रानभाज्यांचा व्यापार करून त्यांनी आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह केला. हापूस आंब्यांचा व्यापार करणारे शिमग्या म्हात्रे हे शिमग्या मामा या नावाने उरण, पेण, पनवेल तालुक्यात सुपरिचीत होते.

## राज्यशास्त्र विद्यार्थ्यांची पंचायत समितीला अभ्यास भेट

। उरण । वार्ताहर ।

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालयातील राज्यशास्त्र विद्यार्थ्यांची राष्ट्रीय पंचायतराज दिनाच्या निमित्ताने उरण येथील तालुका पंचायत समिती कार्यालयास अभ्यास भेट यशस्वीरित्या संपन्न झाली.

राष्ट्रीय पंचायत राज दिनाचे औचित्य साधून राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संदीप घोडके यांच्या संकल्पनेतून व तालुका पंचायत समिती प्रमुख समीर वाठारकर व त्यांच्या सर्व अधिकारी, कर्मचारी वर्गाच्या सहकार्याने तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.आमोद ठक्कर यांच्या मार्गदर्शनाने सदरचा अभ्यास दौरा सर्वार्थाने यशस्वी झाल्याची भावना या अभ्यास सहलीमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आणि पंचायत समिती अधिकारी वर्गाने व्यक्त केले. उरण पंचायत समिती सहविस्तार अधिकारी, इतर अधिकारी सर्वश्री. मिलिंद घाटावकर, गिरीराज धिंगरा तसेच पशुसंवर्धन, आरोग्य, शिक्षण, सामान्य प्रशासन अधिकारी-कर्मचारी यांनी पंचायत समिती, ग्रामपंचायत व ग्रामस्थ यांचे संबंध, भूमिका, कार्य व विविध योजना सविस्तरपणे मांडल्या. त्यानंतर राज्यशास्त्र विद्यार्थी सायली कडू, प्रणवी राजगे, सेजल ठाकूर, ओंकार चौलकर, सानिका जाधव, इंदर पांचाल, अदिती लवे, पुनम लोखंडे व इतर विद्यार्थ्यांनी अधिकारी वर्गांच्या चर्चा सत्रात प्रश्न व मनोगताच्या माध्यमातून सहभाग नोंदवला.

# अर्चना पाटील यांना पुरस्कार प्रदान

। सुतारवाडी । वार्ताहर ।

विविध मालिका, नाट्य, सिने क्षेत्रात आपल्या अभिनयाने वेगळा ठसा उमटविणाऱ्या पेण तालुक्यातील शिर्की येथील अभिनेत्री अर्चना पाटील यांना नुकताच कोल्हापूर येथे शिने अभिनेते निळू फुले स्मृती गौरव पुरस्कार विश्वकर्मा प्रतिष्ठान तर्फे विविध मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात आला. शाल श्रीफळ, आकर्षक स्मृतीचिन्ह, देऊन गुणी अभिनेत्रीला गौरविण्यात आले.

अभिनेत्री अर्चना पाटील यांनी कोल्हापुरात आपल्या गावाचे तालुक्याचे आणि रायगड जिल्ह्याचे नाव लौकिक केले आहे.



त्यांनी आज तगायत अनेक मालिकांमध्ये आपला ठसा उमटविला आहे. स्टार प्रवाह हा वरील लक्ष मालिका, सहकुटुंब सहपरिवार, फुलाला सुगंध मातीचा, तुझे मी गीत गात आहे, मन धागा धागा जोडते, मुरांबा, आई कुठे काय करते, साधी माणसं, लग्नानंतर होईलच प्रेम, उदे ग अंबे उदे तसेच झी मराठीवरील तू चाल पुढं, मी तुला न पाहिले, नवा गडी नवा राज्य, तुला शिकवीन चांगलाच धडा, शिवा, सातव्या मुलीची सातवी मुलगी, तसेच सोनी मराठीवर कन्यादान, मुलगी पसंत आहे, तसेच कलर्स मराठी काव्यांजली, कोण्या राजाची ग तू राणी, प्रेमाची गोष्ट, सोनी मराठीवर निवेदिता माझी ताई, सन मराठी जन्मोजन्मी मी आदिशक्ती, कलर्स मराठी पिंगा ग पोरी पिंगा, उदे ग अंबे उदे, याशिवाय विविध नामांकित नाटकांमध्ये विशेष भूमिका करत असून मराठी चित्रपट डिलिव्हरी बॉय या चित्रपटाचा ही महत्त्वाची भूमिका नामांकित अभिनेत्या बरोबर केली आहे.

त्यांना पेण फेस्टिवल २०१८ चा बेस्ट स्माईल पुरस्कार, विशेष सौंदर्य साम्राज्ञी पुरस्कार, राज्यस्तरीय कलारत्न पुरस्कार, पेण शिर्की ग्रामपंचायत तर्फे अहिल्याबाई होळकर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. अर्चना पाटील यांनी हिंदी मालिका पडोसन, सफल होगी तेरी आराधना मध्ये महत्त्वाच्या भूमिका बजावल्या आहेत. एवढेच नाही तर या प्रसिद्ध गुणी अभिनेत्रीने पुढे जाऊन गाण्यांच्या अल्बममध्ये ही भरारी मारली असून अल्बम शंभू मेरा, बाप्पा यो. पावना आला, कळंबा देवी, आई बाबा, नाद खुळा, गुलाल उरवीन, माझा बाप्पा घरी येतो, मावळा मी शिवरायांचा, पुणेरी पाहुणा मनीचे बावरा आदी अल्बममध्ये नृत्य केले आहे.

## निवडक



### महिला मंडळाच्यावतीने खड्डे बुजवले

**उरण :** तालक्यातील पिरकोन गावात बस स्टॉप जवळील गतिरोधकासमोर मोठा खड्डा पडला होता. त्यामुळे पिरकोनपासून पुढे केलवणे, वशेणी, पुनाडे, सारडेपर्यंत प्रवास करणाऱ्यांना या खड्ड्यांचा भरपूर त्रास होत होता. हि बाब लक्षात येताच श्री गणेश महिला मंडळ बचत गटातील महिलांनी शनिवारी (दि.१९) हे खड्डे बुजवण्याचे काम केले आहे. यासाठी लागणारी दोन टेम्पो खडी आणि गिरीट देण्याचे काम माजी जि.प. सदस्य जीवन गावंड यांनी केले आहे. यावेळी श्री गणेश महिला मंडळ बचत गटाच्या अध्यक्ष लक्ष्मी गावंड, सचिव बिंदू गावंड, सदस्य शारदा गावंड, योगिता गावंड, सामाजिक कार्यकर्ते गणेश गावंड आदी उपस्थित होते.

### भिंगारीच्या मुख्य वरिष्ठ अभियंताची भेट



**पाताळगंगा :** चौक परिसरात बाजरपेठ असल्यामुळे या ठिकाणी सातत्याने ग्राहकांची रेलचेल सुरु असते. मात्र, याठिकाणी सातत्याने विज पुरवठा खंडीत होणे तरी कधी चालू विद्युत वाहिनी रस्त्यावर पडणे, अशा घटना घडत असतात. त्यामुळे येथीलल व्यापारी, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच नागरिकांच्या मनामध्ये भितीचे वातावरण निर्माण होत आहे. दरम्यान, चौक येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी भिंगारी येथील मुख्य वरिष्ठ अभियंता शिंदे यांची भेट घेऊन त्यांच्या समोर समस्यांना पाढा वाचला. १५ दिवसात तुमच्या समस्या मार्गी लावू, असे आश्वासन त्यांच्याकडून देण्यांत आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते गणेश कदम, चौकचे उपसरपंच जगदीश हातमोडे, स्वप्निल सोनटक्के, निखिल मालुसरे, मनोज गुरव, विजय ठोसर, यशवंत जोशी, हर्षल हनुमंते व ग्रामस्थ उपस्थित होते.

### पोलीस पाटील रिक्तपदे भरण्याची मागणी



**तळा :** तालुक्यात ६९ महसुली गावे असून फक्त २१ गावात पोलीस पाटील आहेत. उर्वरित गावात गाव कामगार पोलीस पाटील नसल्याने नागरीकांना शैक्षणिक दाखले, वारस पंचनामा नोंदी व इतर नोंदीच्या दाखल्यांसाठी इतरत्र फिरावे लागते. त्यासंदर्भात गाव कामगार संघटनेच्यावतीने तळा तहसीलदार स्वाती पाटील यांना निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात तालुक्यात असलेली पोलीस पाटीलांची रिक्तपदे लवकरात लवकर भरावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. हे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयाकडे तातडीने पाठवले जाणार असल्याची माहिती तहसीलदार स्वाती पाटील यांनी दिली. यावेळी पोलीस पाटील सचिन कदम, तालुका अध्यक्ष कांतीलाल कजबले व निकित साळवी उपस्थित होते.

### रक्तदान शिबिराचे आयोजन

**महाड :** रविवारी शहरालगत चांभारखिंड येथे जय भवानी क्रीडा मंडळाच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीर हे सोमजाई मंदिर चावडी येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी रायगड भूषण तथा तब्बल १४५ वेळा विक्रमी रक्तदान करणारे शरद गांगल, रायगड भूषण संजय घाडगे यांनी देखील या शिबीरात रक्तदान करून उपस्थित रक्तदात्यांना सतत रक्तदान करून समाजाला रक्ताची असणारी गरज भागविण्याची प्रेरणा दिली. मंडळाच्या वतीने या दोघांचा विशेष सन्मान करण्यात आला होता.

# बसस्थानक अतिक्रमण वाद चिघळला

**| कर्जत | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील कडाव गावातील शासनमान्य एसटी प्रवासी बस स्थानकावर झालेल्या अतिक्रमणाचा वाद चिघळला आहे. अतिक्रमण करणाऱ्यापैकी एकाने पत्रकाराला धमकी दिल्याबद्दल हा वाद आणखीणच चिघळला आहे. ग्रामसेवकांना २ जुलैपर्यंत कारवाई करण्याचा अल्टिमेटम देण्यात आला होता. परंतु, यावर कोणतीही कारवाई न झाल्यामुळे स्थानिक पत्रकारांनी २१ किंवा २२ जुलैपासून लाक्षणिक बेमुदत उपोषण करण्याचा निर्धार केला आहे.

कडाव बसस्थानक हे सार्वजनिक वापरासाठी निश्चित करण्यात आले असतानाही, येथील विनोद पवाळी, रमेश पवाळी आणि उमेश ऐनकर यांनी या जागेवर अनधिकृतपणे दुकाने उभारल्याचा आरोप आहे. गेली दहा वर्षे स्थानिक पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते या अतिक्रमण हटवून प्रवाशांसाठी जागा मोकळी करून देण्याची मागणी करत आहेत. २४ जून रोजी एका पत्रकाराला अतिक्रमण करणाऱ्यांपैकी विनोद पवाळीने धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला. त्यामुळे पत्रकार समाजात संताप पसरला आणि त्यांनी ग्रामसेवक प्रेमसिंग गिरासे यांच्याकडे जाऊन २ जुलैपर्यंत कारवाई करण्याचा अल्टिमेटम दिला होता. मात्र, कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने पत्रकारांनी ३ जुलै रोजी तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि पोलीस निरीक्षक यांना पत्र पाठवून १५ जुलैपासून बेमुदत उपोषण सुरू करण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर सरपंच करुणा पवार आणि ग्रामसेवक प्रेमसिंग गिरासे यांनी २० जुलैपर्यंत अनधिकृत संरचना हटवून बसस्थानकासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यात येईल, अशी हमी दिली. त्यामुळे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले होते.

मात्र, १६ जुलै रोजी ग्रामपंचायतीने फक्त चार स्टील खुर्च्या ठेवून, त्यावर कडाव बस स्थानक असा फलक लावून अपूर्ण आणि दिखाऊ स्वरूपाची कारवाई केली. अतिक्रमण अजूनही शाबूत असताना बस स्थानकाचा फलक बसवण्यात आल्याने पत्रकारांनी याला लोकांची फसवणूक करणारा उपाय म्हणून तीव्र निषेध केला आहे. या प्रकाराला विश्वासघात आणि दिशाभूल असे संबोधून पत्रकारांनी २१ किंवा २२ जुलैपासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर लाक्षणिक बेमुदत उपोषण पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

> **अतिक्रमणाचा काही भाग हटवला गेला आहे. बाकी उर्वरित अतिक्रमण हटवण्यासाठी नव्याने पत्र दिले जाईल. संपूर्ण प्रश्न सोडवण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत आणि पत्रकारांनी उपोषण करावे, अशी वेळ येऊ नये यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.**
> **– प्रेमसिंग गिरासे, ग्रामसेवक, कडाव**




#### तहसीलदारांच्या आदेशाला केराची टोपली

**कर्जतचे तहसीलदार धनंजय जाधव यांनी दि.१८ जुलै रोजी तहसील कार्यालयात पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, कर्जतचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कडावचे ग्रामसेवक, सरपंच, कर्जत एसटी आगार प्रमुख आणि पत्रकार यांची एक संयुक्त बैठक बोलावली होती. यावेळी त्यांनी सर्व कायदेशीर कागदपत्रांची पाहणी करून कडाव गावातील शासकीय एसटी प्रवासी बस थांब्यातील अनधिकृत बांधकाम कर्जत एसटी आगार प्रमुख व कडावचे ग्रामसेवक यांनी संयुक्तपणे कायदेशीर कारवाई करुन तातडीने हटविण्याचे आदेश दिले होते. मात्र, कडाव ग्राम पंचायत व एसटी आगार प्रमुख यांनी तहसीलदारांच्या आदेशाला केराची टोपली दाखवली आहे. तसेच, कायदेशीर कारवाईसाठी केलेल्या दिरंगाई बद्दल त्यांच्यावर ताशेरे ओढले जात आहेत.**

# माथेरान जंगल प्लास्टिकच्या विळख्यात

**| नेरळ | प्रतिनिधी |**

माथेरान या पर्यटन स्थळी येणारे पर्यटक विविध प्रेक्षणीय स्थळांवर पर्यटनासाठी जात असतात. त्यांच्याकडे असलेले खाऊचे रॅपर आणि प्लास्टिक बॉटल तसेच पावसाळा असल्याने वापरले जाणारे रेनकोट हे जंगल भागात कुठेही फेकले जात आहेत. दरम्यान, या प्लास्टिक कचऱ्याकडे माथेरान नगरपरिषदेचे लक्ष नसल्याने जंगल भागात असे प्लास्टिक ही जंगलाचा ऱ्हास करण्यासाठी कारणीभूत ठरत आहेत. त्यामुळे पालिकेने कचराकुंडीत कचरा टाकण्यात यावा, असे आवाहन करणारे फलक शहरात आणि जंगल भागात लावावेत. असे आवाहन पर्यावरण प्रेमींकडून केले जात आहेत.





माथेरानामधील सर्व प्रेक्षणीय स्थळे ही शहराच्या बाजारपेठ भागापासून काही किलोमीटर अंतरावर आहेत.त्यामुळे पर्यटक त्या ठिकाणी जाण्यास निघताना सोबत खाऊ तसेच शीतपेय आणि पाण्याच्या बॉटल सोबत घेऊन निघतात. मात्र, ते प्लास्टिक माथेरानचे जंगल विद्रूप करण्यास कारणीभूत ठरत आहेत. पावसात भिजण्यासाठी आलेले पर्यटक हे माथेरानमध्ये आल्यावर प्लास्टिक पासून बनवलेले वापरा आणि फेकून द्या असे रेनकोट विकत घेतात. पन्नास शंभर रुपयांची किंमत असलेले ते रेनकोट पर्यटक दोन-तीन दिवसांची सहल झाल्यावर रस्त्याच्या कडेला फेकून देतात. त्याचवेळी जंगल भागात फिरत असलेले पर्यटकसोबत घेऊन जाणाऱ्या पाण्याच्या बॉटल आणि खाऊचे रॅपर हे त्यांचा वापर झाल्यावर जागा मिळेल तेथे टाकून देत आहेत. त्याचा मोठा परिणाम शहराचे विद्रुपीकरण होण्यास होत आहे. त्यामुळे जंगल भागात सध्या प्लास्टिक व रेनकोटचा खच दिसून येत आहे. त्यामुळे शहराचे प्लास्टिकीकरण झाले असल्याचे दिसून येत आहे. त्यासाठी पालिकेने सीसीटिव्ही कॅमेरे जंगल भागात बसवावेत आणि त्यातून कचरा जंगलात टाकणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने करण्यात आली आहे.



## घरफोडीच्या तपासादरम्यान मोटारसायकली हस्तगत

**| पोलादपूर | प्रतिनिधी |**

पोलादपूर शहरातील बाजारपेठेमध्ये असलेल्या दुकानाचे लोखंडी शटर उचकटून ६ हजार ९०० रुपयांची रक्कम चोरीला गेल्याची घटन घडली होती. ती रक्कम चोरणाऱ्या चोरट्याचा तपास करताना त्याच्याकडून दोन मोटरसायकलींसह ३ हजार रुपये रोख रक्कमसह हस्तगत करण्यात आली आहे. दरम्यान, घरफोडीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर केवळ २४ तासात आरोपीला ताब्यात घेण्यात पोलादपूर पोलिसांना यश आले आहे.

पोलादपूर शहरातील बाजारपेठेमध्ये असलेल्या आशीर्वाद जनरल स्टोअर्समध्ये १३ जुलै रोजी रात्रीच्या सुमारास चोरट्याने दुकानातील लोखंडी शटर उचकटून एकूण ६ हजार ९०० रुपयांची चोरी केली होती. या घटनेची माहिती दुकानदार अजय गांधी यांनी १७ जुलै रोजी पोलादपूर पोलीस ठाण्यात दिली. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांकडून शहरामधील जवळपास ८ ठिकाणाचे सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करण्यात आली.त्यात एक संशयित व्यक्ती आढळून आला. त्यांनतर त्याची ओळख पटविण्यात यश येवून संशयित व्यक्तीचा मामा हा पोलादपूर नजीक रानबाजीरे आदिवासी वाडीत राहत असल्याचे समजले. तात्काळ त्यांच्याकडे जाऊन त्यांना ते फुटेज दाखविण्यात आले आणि चोराची ओळख पटविण्यात आली. त्याचे नाव राजू दिनेश मुकणे (२५) असून तो महाड येथील कावळे कुंभार्डे आदिवासी येथे असल्याचे समजले. त्या अनुषंगाने कावळे कुंभार्डे गावात पोलिसांनी सापळा रचून शुक्रवारी (दि.१८) राजू मुकणेला अटक करण्यात आली. अटकेदरम्यान दोन दुचाकी चोरल्याचे कबूल केले.

### पर्यटकांच्या गाडीला घरोशी येथे अपघात

**महाड :** पावसाळी पर्यटनासाठी किल्ले रायगड परिसरात आलेल्या एका खाजगी बसला माणगाव किल्ले रायगड मार्गावर घरोशी गावाच्या हद्दीत अपघात झाला. या अपघातात दहा प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत.सद्या शनिवार आणि रविवार या दोन दिवशी रायगडावर पावसाळी पर्यटनासाठी गर्दी होत आहे. आज देखील गडावर गर्दी होती. पावसाळी पर्यटनासाठी पुणे येथून खाजगी बसने गडावर आलेल्या पर्यटकांच्या गाडीला परतीच्या प्रवासात अपघात झाला.

या पर्यटकांची खाजगी बस घरोशी गावाच्या हद्दीत पलटी झाली. यामुळे बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांपैकी अकरा प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. या प्रवाशांना पाचाड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. हा अपघात गाडी रस्त्यावरून घसरल्याने झाला असल्याचे एका प्रवाशाने सांगितले.

# विक्रम गायकवाड यांची तालुका उपाध्यक्षपदी निवड

**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

चौक वावंढळ येथील तडफदार युवक म्हणून विक्रम गायकवाड यांच्याकडे पाहिले जाते. ते राजकारण व समाजकारण यांची सांगड घालून जनसेवा करण्यासाठी सातत्याने अग्रेसर असतात. विशेष म्हणजे त्यांचे आजोबा सुद्धा शेकापक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ता होते. त्यामुळे विक्रम गायकवाड यांची शेकापच्या खालापूर तालुका पुरोगामी युवक संघटनेच्या तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. खालापूर तालुका नगराध्यक्ष संतोष जंगम, शेकापचे किशोर पाटील यांच्यासह इतर प्रमुखांच्या उपस्थित त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. गायकवाड यांच्या कामाची चळवळ विलक्षणीय असून त्यांना देण्यात आलेले हे पद निश्चितच पक्ष वाढविण्यासाठी उपयोगी ठरेल, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.



## माथेरानमध्ये दुसऱ्यांदा चोरी

**| कर्जत | प्रतिनिधी |**

माथेरान मधील इंदिरानगर परिसरातील रस्त्यालगत असेलेले महेंद्र जाबरे यांचे साई कृपा जनरल स्टोअर्स येथे चोरीची घटना घडली आहे. या ठिकाणी चोरट्यांनी धाडसी चोरी करून रोख रकमेसह दुकानातील सिगारेटची पॉकीट व इतर सामान मिळून एकंदरित २५ हजार पेक्षा जास्त ऐवज लंपास केला आहे. ही शुक्रवारी (दि.१८) रात्रीच्या सुमारास घडली असून ही दुसरी चोरीची घटना आहे. वर्षाभरापूर्वी देखील अशीच चोरीची घटना घडली होती. मात्र, त्याचा शोध अद्याप पोलिसांना लागलेला नाही. त्यातच ही दुसरी घटना घडल्यामुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित केला जात आहे. दरम्यान, या चोरीचा तपास करण्यासाठी पोलीसांनी श्वान पथक आणले होते. परंतु, हे श्वान पथक देखील चोराचा मागोवा घेऊ शकले नाही. ही चोरी माहीतगार चोरा कडूनच झाली असून या घटनेमुळे माथेरानमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेचा तपास माथेरान पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी एपीआय ए.एम. सोनवणे यांच्या मार्गदर्शनखाली गणेश गिरी करत आहेत.





**१ ऑगस्टपासून होड्या समुद्रात लोटण्याची शक्यता | समुद्राला शांत होण्याची प्रार्थना**

# मुरुड समुद्रकिनारी मच्छीमारांची लगबग

**| मुरुड-जंजिरा | वार्ताहर |**

दोन महिन्यांपासून बंद असलेली मासेमारी सुरू होण्यासाठी काही दिवसच उरले आहेत. मासेमारीचा पहिला हंगामाला सुरू होत असल्याने मच्छिमार समुद्राला शांत होण्याची प्रार्थना देवाकडे करीत आहेत. तसेच, समुद्रात होड्या लोटण्यापुर्वी होड्यांची डागडुजीसह अन्य कामे पुर्ण करण्याची लगबग मुरुड तालुक्यांतील मच्छिमारांची सुरू झाली आहे.

मुरुड तालुक्यात राजपुरी, एकदरा, मुरुड, मजगाव, दांडा, काशिद , बोर्ली, कोर्लई, साळाव व चोरढे मिळुन साडेसातशेहून अधिक मासेमारी नौका चालकांनी दोन महिने शासन आदेशाप्रमाणे पूर्णपणे मच्छिमारी बंद ठेवली आहे. गेल्या ३ ते ४ वर्षांपासुन समुद्रातील हवामान बिघडल्याने वादळाचा सामना करवा लागल्याने कोळीबांधव आर्थिक नुकसानीत आहे. पावसाळ्यात मत्स्य प्रजनन काळ असल्यामुळे दोन महिने खोल समुद्रातील मच्छिमारी बंद असते. त्यामुळे मच्छिमारांना नाहीलाजास्तव किनाऱ्यालगत मिळणाऱ्या जवळा, कोळंबी, बोईट इत्यादी बारीक मासळीवर आपली उपजिविका सुरू ठेवावी लागते. यंदा पाऊस कमी प्रमाणात असल्याने मच्छिमारीच्या पहिल्या हंगामाला लवकर सुरूवात होत असल्याचे कोळीबांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. सध्या १ ऑगस्टपासून होड्या समुद्रात सोडल्या जाणार असल्याची चर्चा असल्याने त्यांची लगबग सुरू आहे. पूर्वतयारी म्हणून समुद्रकिनारी जाळी विणणे, होड्यांच्या डागडूजीसह तेल-पाणी, रंग लावणे, बोर्ड रंगवणे इत्यादी कामे अंतीम टप्प्यात आहेत. त्याचबरोबर होडीत जाळींसह डिझेल, बर्फ, अन्न धान्य भरणे, तसेच खलाशांची जमवाजमव इत्यादी तयारी काही मच्छीमारांनी चालविली आहे.

सध्या खवळलेल्या समुद्राच्या पाण्याला करंट असल्याने किती नौका निघतील याचे अनुमान लावणे तुर्तास कठीण आहे. तरी, सुरूवातीला नेमक्याच मोठ्या नौका मच्छिमारीसाठी खोल समुद्रात जाणार असल्याचे कोळीबांधवांकडून सांगण्यात येत आहे.

#### आराध्याला साकडं

**यंदा मच्छिमारीच्या पहिल्या हंगामाला १५ दिवस अगोदर सुरूवात होत असल्याने सुरवातीचा हंगाम चांगला जाईल, असे तालुक्यातील कोळी बांधवांना वाट आहे. त्यामुळे कोळी समाज हा धार्मिक परंपरा जपणारा असुन समुद्रात होड्या लोटण्यापूर्वी आराध्य दैवत मल्हार मार्तंड देवाला कौल लावण्याचा त्यांचा प्रघात आहे. समुद्रात भरपुर मच्छी मिळू दे आणि नुकसान टळू दे, अशा मनोभावे आराध्याची प्रार्थना केली जाते. तसेच, होडीची पुजा अर्चा करून होड्या समुद्रात सोडल्या जातात.**

> **मासेमारी बंदी काळात मच्छीमारांनी केलेला खर्च वाया जातो. सरकार आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांसाठी मदत करते. अशा स्वरूपात मच्छीमार बांधवांना देखील अशा परिस्थितीत आर्थिक पॅकेजच्या माध्यमातून मदत करावी.**
> **–मनोहर बैले, उपाध्यक्ष, रायगड मच्छीमार संघ**

## कालव्यावरील साकव गेला वाहून

**| खांब | वार्ताहर |**

मागील आठवड्यात कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे रोहा तालुक्यातील देवकान्हे धानकान्हे हद्दीतील कालव्यावरील आदीवासी वाडीकडे जाणारा साकवच वाहून गेला आहे. येथील ग्रामस्थांच्या रहदारीच्या मार्गावरील हे साकव कोसळल्याने संतापाची लाट उसळली आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने यावर लवकरात लवकर उपाययोजना करावी, अशी मागणी आदिवासी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

रोहा तालुक्यातील कोलाड पाटबंधारेचा उजवा तीर कालव्याची दुरुस्ती गेली अनेक वर्षे सुरू आहे. त्यातच देवकान्हे धानकान्हे हद्दीत कालव्यावरील जीर्ण झालेले साकव काढून त्या ठिकाणी नवे साकव पाटबंधारे विभागाच्यावतीने बांधण्यात आले आहेत. मात्र, मागील तीन चार दिवसांपूर्वी मुसळधार कोसळलेल्या पावसामुळे नव्याने बनविण्यात आलेला साकवच वाहून गेला आहे. त्यामुळे येथील आदिवासी नागरिकांचा मुख्य रहदारीचा मार्गक्रमण बंद झाल्याने त्यांच्यात संतापाची लाट उसळली आहे. सध्या पावसाळ्यात खरिपाच्या भात पिकांची लागवड सर्वत्र सुरू आहे. त्यामुळे येथील आदिवासी नागरिक हे मोलमजुरी करण्यासाठी या मार्गावरून ये-जा करत असतात. ऐन मोलमजुरी काळातच रहदारीचा मार्ग वाहून गेल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे पाटबंधारे खात्याने याचे गांभीर्य लक्षात घेऊन याठीकाणी लवकरात लवकर उपाय योजना करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.



# माजले आहेच, पण कोण?

राज्य विधिमंडळाचे अधिवेशन शुक्रवारी संपले. येती पाच वर्षे आपल्या बहुमताच्या जोरावर वाटेल त्या गोष्टी फडणवीस सरकार कशा रेटून नेणार आहे त्याची चुणूक पुन्हा एकदा यावेळी दिसली. जनसुरक्षा कायद्याच्या बाबतीत सरकारने विधानसभेतील विरोधकांना हातोहात गुंडाळले. काँग्रेसवाले आता मोठा आरडाओरडा करीत आहेत. पण विधानसभेत चर्चेला आले तेव्हा यांच्या सदस्यांची दातखीळ बसली होती. विधेयकावर मतदान मागावे एवढेही यांना सुचले नाही. निव्वळ आवाजी बहुमताच्या जोरावर विधेयक मंजूर झाले. आता प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी आमदारांना कारणे दाखवा नोटिसा काढल्या आहेत. गेल्या कित्येक वर्षात प्रदेशाध्यक्षाने असा शिस्तीचा बडगा कधी उगारला नव्हता. त्यामुळे हर्षवर्धन यांचे अभिनंदन. पण हा सर्व बैल गेला आणि झोपा केला असा प्रकार आहे. या नोटिसांवर पुढे कारवाई होण्याची शक्यता शून्य आहे. आता सकपाळ यांनी या कायद्याच्या विरोधात जिल्ह्याजिल्ह्यात कार्यक्रम घेण्याचे आदेश दिले आहेत. काल स्वतः त्यांनी मुंबईत विविध पक्ष व संघटनांसोबत एक बैठकही घेतली. याला शेकापचे प्रतिनिधीही हजर होते. या कायद्याच्या विरोधात येत्या काही दिवसात राज्यभरात मोठे आंदोलन उभे राहण्याची गरज आहे. अन्यथा, पुढेमागे शेकाप, कम्युनिस्ट पक्ष अशा संघटनांनाही अर्बन नक्सल ठरवून त्यांच्यावर कारवाई करायला हे सरकार कमी करणार नाही. दरम्यान, विरोधकांचा आवाज बंद करण्याचे कायदे सरकार का आणू पाहत आहे याची उत्तरेही याच अधिवेशनात मिळाली. एक म्हणजे लाडकी बहीण योजनेमुळे सरकारचे पार दिवाळे वाजले आहे. तिजोरीतून कशीबशी भागवाभागवी सुरु आहे. बहिणींचे पैसे मिळत नाहीत अशा तक्रारी दादांच्या राष्ट्रवादीचे आणि भाजपचे आमदारच करत असल्याचे दिसले. अधिवेशनाच्या काहीच दिवस आधी सर्व आदिवासी आमदारांनी राज्यपालांची भेट घेऊन आपल्या विभागाचा निधी इतरत्र वळवला जात असल्याबद्दल तक्रार केली होती. यांचे नेतृत्व दादा गटाचे नरहरी झिरवाळ यांनीच केले होते.

### जनसुरक्षेचे कारस्थान

मुख्यमंत्री किंवा अर्थमंत्री यांना डावलून थेट राज्यपालांकडे अशी तक्रार करणे म्हणजे आपल्याच सरकारवर अविश्वास दर्शवणे. हे होऊनही फडणवीस आणि अजितदादा मात्र निधी वळवला जात नसल्याचे सांगत आहेत. येत्या काळात आमदार व मंत्र्यांमधला हा असंतोष रस्त्यावरही येणार आहे. विविध विभागांच्या खर्चात कपात चालू आहे. दलित, आदिवासी व बहुजन विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्त्या दीड-दीड वर्षे मिळत नाहीत अशा तक्रारी आहेत. नऊ जुलैच्या संपात महावितरण वगैरेंच्या कर्मचाऱ्यांनी भाग घेतला होताच. कंत्राटदारांचे पैसे थकित असल्याबद्दल त्यांनी कितीतरी वेळा तक्रारी करून झाल्या आहेत. त्यामुळे हा सगळा पोकळ डोलारा आहे. तो कधीही कोसळून पडेल अशी अवस्था आहे. त्यावेळी सरकारविरुद्ध जी आंदोलने होतील ती चिरडून टाकण्याची आतापासून तयारी चालली आहे. सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्थेला बाधा आणण्याचे कारण देऊन कोणालाही तुरुंगात टाकण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आली आहे. व्यक्ती नव्हे तर संघटनांविरुद्धहा कायदा लावला जाईल असे फडणवीस सांगत आहेत. पण डावी मंडळी एकेकटी कधीच लढत नसतात. ते संघटनेसकटच असतात. मग ती संघटना छोटी असो वा मोठी. पण या सरकारला हेच खुपते आहे. खुद्द कायद्यातच कडव्या डाव्या संघटनांविरुद्ध असे म्हणून ठेवले आहे. हे कडवे डावे कोण हे फडणवीस ठरवणार आणि पोलिस त्यांना आत टाकणार. परभणीला आंबेडकर पुतळ्याच्या विटंबनेच्या विरोधात निघालेल्या मोर्चातून अशाच रीतीने सोम नाथ सूर्यवंशीला अटक करण्यात आली व नंतर कोठडीतल्या मारहाणीमुळे त्याचा मृत्यू झाला. आता पोलिसांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात यावा असे आदेश न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे या सरकारचे व पोलिसांचे हेतू किती दुष्ट आहेत हे सर्व जनतेसमोर आहे. बदलापूर शाळकरी मुलींवरील अत्याचार प्रकरणातील आरोपीला गोळ्या घालून ठार करण्यात आले. फडणवीस व शिंदे यांनी कसा न्याय केला म्हणून मोठी होर्डिंग्ज लावण्यात आली. पण हा सरळसरळ पोलिसांनी केलेला खून होता हे न्यायालयाच्या तपासात उघड झाले. याच रीतीने हे सरकार डाव्या कार्यकर्त्यांना ठार करायला मागेपुढे पाहणार नाही.

### निव्वळ माफीवर सुटका

संजय गायकवाड यांनी आमदार निवास कँटिन कर्मचाऱ्याला मारहाण केली. त्यांच्याविरुध्द कोणताही गुन्हा दाखल झाला नाही. कँटिनवाल्यावर मात्र तात्काळ कारवाई झाली. शेवटच्या दिवशी तर कहर झाला. गोपीचंद पडळकरांनी एका नामचीन गुंडाला आपल्यासोबत आणले व त्याने ऐन विधानभवनामध्ये जितेंद्र आव्हाडांच्या कार्यकर्त्याला मारहाण केली. आता त्या गुंडाला पोलिसांनी पकडले आहे. हे पडळकर देवेंद्र फडणवीसांचे लाडके कार्यकर्ते आहेत. त्यांनी केवळ माफी मागितली आणि सोडून देण्यात आले. सगळे आमदार माजले आहेत असे जनता बोलत आहे असे फडणवीस मोठ्या रागाने म्हणाले व सर्व माध्यमांनी त्यांच्या मोठाल्या बातम्या केल्या. पण ज्या पडळकरांमुळे ही सर्व गुंडगिरी घडली त्यांना भाजपने किंवा फडणवीसांनी काहीही शिक्षा केली नाही. त्यांनी सभागृहात दिलगिरी व्यक्त केली व त्यावर प्रकरण संपले. नंतर इतके सगळे होऊनही, मी नेत्यांच्या आदेशामुळे गप्प आहे, असा इशारा पडळकरांनी बाहेर येऊन माध्यमांसमोर दिला. फडणवीसांचा हात आपल्या पाठीवर आहे याची खात्री असल्याखेरीज त्यांनी अशी गुर्मी दाखवली नसती. फडणवीसांना हे सांगायला हवे की, आमदार माजले आहेत असे नव्हे, तर फडणवीसांचे सरकार माजले आहे असे आम जनता आज म्हणत आहे. हिंदी-सक्ती आणि शक्तीपीठ महामार्गाला विरोध हे अधिवेशनाच्या काळातले महत्वाचे विषय होते. यातील हिंदीच्या सक्तीवरून फडणवीसांनी अधिवेशनाच्या आदल्या दिवशीच तात्पुरती माघार घेतली. पण शेवटच्या दिवसापर्यंत त्यांचा सूर बदलला. वास्तविक या प्रकरणी आता नरेंद्र जाधव यांची समिति नेमण्यात आली आहे. त्यामुळे तिचा अहवाल येईपर्यंत काहीही फडणवीसांनी काहीही धोरणात्मक बोलणे उचित नाही. पण काय वाटेल ते झाले तरी त्रिभाषा सूत्र राज्यात लागू होणारच असे त्यांनी मुंबई तक या वाहिनीशी बोलताना जाहीर केले. खरे तर अधिवेशन चालू असताना बाहेर असे विधान केल्यावर पूर्वीच्या काळी गदारोळ झाला असता. पण आता मोठमोठ्या नियमांचे व प्रथांचे खून पडत असताना किरकोळ संकेतांच्या हाणामारीला कोण विचारतो अशी स्थिती आहे. गंमत म्हणजे त्रिभाषा सूत्र राज्यात पूर्वीपासून लागू आहेच. पाचवीपासून मराठीच्या जोडीने इंग्रजी व हिंदी शिकावी लागणाऱ्यांची ही सातवी किंवा आठवी पिढी असेल. पण पडलो तरी नाक वर हा यांचा खाक्याच आहे. शक्तीपीठा मार्गालाही सर्वत्र तीव्र विरोध चालू आहे. पण तो विषय अधिवेशनात फारसा चर्चेला येऊच नये अशी बेमालूम व्यवस्था सरकारने केली. आता विरोधकांना रस्त्यावरची लढाई करावी लागेल.

## विचार

# नवतंत्रज्ञान आणि महिला

**_घरकामात गढलेल्या गृहिणीला आज स्मार्टफोन आणि इंटरनेटसारख्या आयुधांचा वापर करुन डिजिटल मध्यस्थ म्हणून व्यावसायिक सेवा पुरवणे शक्य आहे. सरकार आणि विविध संस्था राबवत असलेल्या मुद्रा योजना, स्टँड-अप इंडिया आणि विशेष प्रशिक्षणासारख्या उपक्रमांमुळे आज अनेक महिला उद्योजक आर्थिक विकासाला आणि सामाजिक परिवर्तनालाही हातभार लावत आहेत. तंत्रक्रांतीमुळे भविष्यात हे योगदान आणखी वाढेल._**



डॉ. दीपक शिकारपूर

आजघडीला देश एका संक्रमणावस्थेतून जातो आहे. सध्या विविध आघाड्यांवरच्या विकासाचा वेग किंचित मंदावल्यासारखा दिसतो आहे खरा. मंदीचे ढग अजूनही क्षितिजावर रेंगाळत आहेत, पण सगळे चित्र निराशाजनक नक्कीच नाही. विकासाचा, वाढीचा, उत्पादनाचा वेग मंदावला आहे, परंतु थांबलेला नाही. ही अवस्था लवकरच जाईल. जगात अशा रीतीने चिरंतन किंवा शाश्वत काहीही नसते आणि म्हणूनच या मंदीचा जास्त बाऊ करू नये. कारण या परिस्थितीतून बाहेर येण्यासाठी आणि देदिप्यमान यश मिळवण्यासाठी आपल्याकडे विविध कौशल्ये आत्मसात केलेली माणसे उर्फ स्किल्ड मॅनपॉवर मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. इथे महिलाशक्ती अतिशय महत्वाची आहेत. एकविसाव्या शतकाची सुरूवात होऊन आता २५ वर्ष झाली आहेत. तरीही, गेल्या पंधरा-वीस वर्षांमध्ये ज्या प्रकारे बदल झाले तितके त्या आधीच्या ५० वर्षांमध्येही झाले नव्हते असे म्हणता येईल. स्मार्टफोनच्या रूपाने संगणकीय क्रांतीचे मानवी जीवनाच्या विविध पैलूंवर झालेले परिणाम आपण पाहतो आणि अनुभवतो आहोतच. नवतंत्रज्ञान आणि महिला या दोन घटकांचा आजच्या समाजात अत्यंत महत्त्वपूर्ण संबंध आहे. नवतंत्रज्ञानाच्या वापरामुळे महिलांना विविध क्षेत्रांमध्ये आपली क्षमता सिद्ध करण्याचे, नव्या आव्हानांना सामोरे जाण्याचे आणि आपल्या जीवनातील समस्या सोडवण्याचे अद्वितीय मार्ग मिळाले आहेत. आज महिलांसाठी इंटरनेट, स्मार्टफोन, आणि डिजिटल उपकरणे यांचा वापर अत्यंत सोपा आणि उपयुक्त झाला आहे. विविध ऑनलाइन प्लॅटफॉर्म्सवर शिक्षण घेणे, ऑनलाइन व्यापार सुरू करणे आणि सामाजिक नेटवर्किंग करणे यामुळे महिलांना आपला व्यवसाय किंवा करियर वाढवण्याची संधी मिळाली आहे.

महिलांना घराबाहेर काम करण्यासाठी सुरक्षित पर्यावरण मिळवण्यासाठीही तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वपूर्ण ठरला आहे. आपल्या देशात महिलांनी अनेक स्टार्ट अप्स सुरु केले असून त्यात पहिल्या पिढीच्या युवा मुलींचे प्रमाण लक्षणीय आहे. महिला या त्या तंत्रज्ञानाच्या फक्त ग्राहक नाहीत तर, सध्याच्या आणि भविष्यातल्या डिजिटल विश्वाच्या शिल्पकारही आहेत. म्हणूनच हे सगळे महिलांच्या सहभागाबद्दलचे महत्त्वाचे घटक आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञानामध्ये महिलांनी आतापर्यंत नेहमीच महत्त्वाचं योगदान दिलं आहे. 'द हिडन फिगर्स' हे पुस्तक आणि नंतर त्यावर बनलेल्या चित्रपटामुळे ही बाब आणखी चांगल्या प्रकारे अधोरेखित झाली आणि समाजाच्या सर्व घटकापर्यंत व्यापक रितीने पोहोचली. 'चूल आणि मूल' हे झाले मागील शतक. आता महिला 'मोबाईल आणि माउस' वापरून कर्त्या तर झाल्याच पण आत्मनिर्भरही झाल्या. काही दशकांपूर्वी हा बदल मोठ्या शहरापुरता होता आता तसे नाही. कोविडनंतरच्या 'वर्क फ्रॉम होम' कार्यपद्धतीमुळे महिलांना घरबसल्या काम करायची संधी मिळाली. इतर जबाबदाऱ्या सांभाळून आता अनेक महिला कार्यरत आहेत. भारत हा वेगाने विकसित होणारा देश असून या विकासात महिलांचा सहभाग, विशेषतः उद्योजकतेच्या माध्यमातून, अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. पूर्वी महिलांचा सहभाग घरगुती कामांपुरता मर्यादित होता, परंतु आता त्या विविध क्षेत्रांमध्ये व्यावसायिक आणि यशस्वी उद्योजक म्हणून पुढे येत आहेत. या बदलामुळे केवळ महिलांचेच सक्षमीकरण होत नाही, तर देशाच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीलाही हातभार लागतो.

इंटरनेट आणि डिजिटल साधनांमुळे महिलांना शिक्षणाच्या नवीन संधी मिळाल्या आहेत. दूरस्थ शिक्षण आणि ऑनलाइन अभ्यासक्रमांमुळे ग्रामीण भागातील महिलाही उच्च शिक्षण घेऊ शकतात. डिजिटल साक्षरता वाढल्यामुळे महिलांना माहिती मिळवणे, कौशल्ये विकसित करणे आणि स्वतःचा विकास करणे सोपे झाले आहे. ऑनलाइन व्यवसाय आणि ई-कॉमर्सच्या माध्यमातून महिला स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकतात. यामुळे आर्थिक स्वातंत्र्य मिळून त्या कुटुंबाच्या आर्थिक विकासाला हातभार लावू शकतात. आज डिजिटल बँकिंग आणि ऑनलाइन पेमेंटमुळे आर्थिक व्यवहार करणे सोपे झाले आहे. परिणामी, महिलांना आर्थिक निर्णय घेणे अधिक सोपे झाले आहे. सोशल मीडिया आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्ममुळे महिलांना आपले विचार मांडण्याची आणि सामाजिक मुद्द्यांवर आवाज उठवण्याची संधी मिळाली आहे. यामुळे महिलांसाठी सुरक्षित ऑनलाइन प्लॅटफॉर्म्स तयार करून सायबर गुन्ह्यांना आळा घालणे गरजेचे बनले आहे. महिला उद्योजक अनेकदा आपल्या व्यवसायात नाविन्यपूर्ण कल्पना आणि दृष्टीकोन आणतात. त्या समाजातील गरजा ओळखून उत्पादने आणि सेवा विकसित करतात. उदाहरणार्थ, तंत्रज्ञान क्षेत्रात अनेक महिलांनी स्टार्ट-अप्स सुरू केले आहेत, जे नवीन ॲप्स, सॉफ्टवेअर आणि तांत्रिक सोल्यूशन्स प्रदान करतात. पर्यावरणपूरक उत्पादने, सामाजिक उद्योजकता आणि आरोग्य सेवांसारख्या क्षेत्रांमध्येही महिलांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या नाविन्यपूर्ण दृष्टिकोनामुळे व्यवसायात विविधता येते आणि ग्राहकांना चांगल्या सेवा मिळतात.

एखादी महिला उद्योजक यशस्वी होते, तेव्हा इतर महिलांसाठी प्रेरणास्थान बनते. यामुळे अनेक महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची आणि आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर होण्याची प्रेरणा मिळते. महिला उद्योजक सहकारी कर्मचारी घेताना महिलांना प्राधान्य देतात. यामुळे महिलांच्या रोजगाराला चालना मिळते आणि त्यांच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारते. याशिवाय, अनेक महिला उद्योजक सामाजिक जबाबदारी स्वीकारून शिक्षण, आरोग्य आणि पर्यावरणासारख्या क्षेत्रांमध्येही योगदान देतात. यामुळे समाजाचा सर्वांगीण विकास होतो. यापुढील काळात पूर्वी निरक्षरांना मदतीसाठी लागायचे तसे लेखनिक डिजिटल मदतनीसाच्या रुपात सर्वत्र (अगदी शहरी भागातही) हजारोंच्या संख्येने लागणार आहेत. हे एक अर्थार्जनाचे साधन तसेच सामाजिक कटिबध्दतेचे सामूहिक उदाहरण असू शकते. कोणत्याही व्यवहारामध्ये देणारा आणि घेणारा यांच्यामध्ये सरळ व्यवहार होत नाही. हा व्यवहार दोघांच्याही मनाप्रमाणे व्हावा यासाठी विविध नियम आणि पायंडे माहीत असणारा मध्यस्थ गरजेचा असतो. असा मध्यस्थ पैसे कमावतो, परंतु त्याच्यामुळे व्यवहारातल्या दोन्ही बाजूंच्या व्यक्तींना समाधान प्राप्त होत असते. विशेष म्हणजे मध्यस्थी करण्याचा असा व्यवसाय हा बिनभांडवली असतो. त्या व्यवहाराची डिजिटल माहिती हेच त्याचे भांडवल असते.

डिजिटल मध्यस्थ ही एक संकल्पना आहे, ज्याला स्मार्टफोन आणि इंटरनेट या आयुधांचा वापर करणे जमले आहे. सुशिक्षित पदवीधरांबरोबरच घरकामात गढलेल्या गृहिणीलाही हे शक्य आहे. गेल्या पिढीपर्यंत गृहिणीला दुसरे काही करणे शक्यच नसायचे कारण घरातली कामेच आवरताना तिचा दिवस संपत असे. परंतु सध्या नवतंत्रज्ञान हाताशी असल्याने, विभक्त कुटुंबांमुळे आणि बऱ्याचश्या सुशिक्षित घरांनी स्वीकारलेल्या सामाजिक बदलांमुळे स्त्रीच्या मागचा घरकामाचा एकंदर रामरगाडा कमी झाला आहे आणि नवा विचार स्वीकारून अंमलात आणणे शक्य झाले आहे. महिला उद्योजकांना भांडवलाची उपलब्धता, बाजारपेठेतील स्पर्धा, कुटुंबाची जबाबदारी आणि सामाजिक पूर्वग्रह यांसारख्या अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. मात्र, सरकार आणि विविध संस्था महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी अनेक योजना आणि कार्यक्रम राबवत आहेत. मुद्रा योजना, स्टँड-अप इंडिया आणि महिला उद्योजकांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम यांसारख्या उपक्रमांमुळे महिलांना व्यवसाय सुरू करण्यास मदत मिळते. 'डिजिटल इंडिया'सारख्या योजनांमुळे महिलांना नवीन तंत्रज्ञान वापरून व्यवसाय वाढवण्याची संधी मिळत आहे. थोडक्यात, भारतीय महिला उद्योजक केवळ आर्थिक विकासालाच नव्हे, तर सामाजिक परिवर्तनालाही हातभार लावत आहेत. त्यांचे योगदान देशाच्या प्रगतीसाठी आणि राष्ट्रनिर्माणासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. तंत्रक्रांतीमुळे भविष्यात हे योगदान आणखी वाढेल, यात शंका नाही.

deepak@deepakshikarpur.com
(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## चर्चा आजची

# अनाथांचा नाथ म्हणवणाऱ्यांना अनाथांचाच विसर



संतोष राऊळ

२०२३ साली जिल्ह्यात एक दुर्देवी घटना घडली होती. खालापुर तालुक्यातील इर्शाळवाडीत १९ जुलै रोजी दरड कोसळून मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली होती. तब्बल ८४ जण मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले होते. त्या घटनेला नुकतेच दोन वर्ष पुर्ण झाले आहेत. तरीदेखील ती भयावह घटना नजरेसमोरून जात नाही. या दुर्घटनेतून जे बचावले आहेत त्यांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. परंतु, तरीदेखील त्यांना नाहक त्रासांना सामोरे जावे लागत आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अनाथ मुलांना तालुक्यातील औद्योगिक वसाहतीत रोजगार देण्याचे आश्वासन देण्यात आले होते; परंतु, तेही आश्वासन फोल गेल्याचे दरडग्रस्तांकडून बोलले जात आहे. तसेच, दरडग्रस्तांना राहण्यापुरती जागा असल्यामुळे पोटापाण्यासाठी शेती किंवा व्यवसाय करण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आल्याचे बोलले जात आहे.

२०२३ साली जुलै महिन्यात मुसळधार पावसात खालापुरातील इर्शाळवाडीवर दरड कोसळली आणि संपुर्ण गाव त्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले. काही सुखरूप बचावले तर ८४ जणांना आपला जीव गमवावा लागला. परंतु, जे सुखरूप बचावले त्यांचे आताचे जगत असलेले जीवन देखील भयावह असल्याचे बोलले जात आहे. कारण त्या दुर्घटनेत त्यांचे छत्र तर हरवलेच, त्यासोबतच आप्तेष्ट, शेतजमीन, गुरं-ढोरं सर्व काही हरवलं. ही घटना जेव्हा घडली तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दरडग्रस्त तरूणांना तालुक्यातील औद्योगिक वसाहतीत रोजगार देऊ, असे आश्वासीत करण्यात आले होते. मात्र, ते आश्वासन त्यांच्याकडून पाळले गेले नसल्याचा आरोप येथील आदिवासी बांधवांनी केला आहे. सिडकोमध्ये अवघ्या दहा तरूणांना कंत्राटी पद्धतीने भरती केले असून त्यातील निम्म्याहून अधिक तरूण घरीच बसल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे. तसेच, एका सामाजिक संस्थेने दरडग्रस्त अनाथ मुलांना दत्तक घेण्याचे आश्वासन दिले होते. ती संस्था अनाथांचे नाथ म्हणवणाऱ्या तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सुपुत्र खा. श्रीकांत शिंदे यांची असून, त्यांचे आश्वासन देखील हवेत विरले असल्याचे आदिवासी बांधवांकडून बोलले जात आहे. त्यामुळे छत्र हरवलेल्या अनाथ मुलांवर आश्रम शाळेत धडे गिरवण्याची वेळ आली आहे. जर आमच्या मुलांना दत्तक घ्यायचे नव्हते, आमच्या तरूणांना नोकरी द्यायची नव्हती, तर आश्वासन द्यायचेच कशाला? त्यांनी फक्त प्रसिद्धी मिळविण्यासाठी भंपक आश्वासन दिल्याच्या संतप्त प्रतिक्रीय दरडग्रस्त आदिवासी बांधवांमधून होत आहेत.

सध्या १३९ लोकवस्ती असलेल्या दरडग्रस्तांना शासनाने टुमदार घरे बांधून दिली आहेत. तसेच, त्यांना पाणी, रस्ता, वीज देखील दिली. मात्र, रोजगार नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. तसेच, वीजेचे बील भरताना देखील त्यांच्या नाकेनऊ येत असल्याचे बोलले जात आहे. दरडीखाली नाचणी, वरी, भात पिकणारी कसदार जमीन गाडली गेली. तसेच, कुटुंबातील सदस्यांसह बैलजोडी, दुभत्या गाई, बकऱ्या व शेतीचे साहित्य गाडले गेले. भाजीपाला पिकवला जात असणारी परसबागही गाडली गेली. सध्या हाताला काम नसल्याने उपासमारीची वेळ आली असल्याचे आदिवासी बांधवांकडून बोलले जात आहे. तसेच, दरडग्रस्तांच्या नावावर जमीनीचा सातबारा नसल्याने त्यांना शासकीय योजनांचा देखील लाभ घेता येत नाही. त्यामुळे नवीन वसाहतीच्या आसपास जमिनीसह शेतकरी कर्ज व शेतीची अवजारे मिळावीत, अशी मागणी त्यांच्याकडून करण्यात येत आहे. परंतु, दोन वर्षे उलटली तरी अनाथांचा नाथ म्हणवणाऱ्यांकडून दुर्लक्ष होत असल्याची खंत दरडग्रस्तवासियांच्या मनांत निर्माण झाली आहे.

शासनाने सुरूवातीचे दोन ते तीन महिने मोफत धान्यपुरवठा, आरोग्य सेवा व गॅस सिलेंडर पुरवले. मात्र, त्यानंतर शासनाने पाठ फिरवली आहे. नाहिलाजाने शेजारील गावांत जाऊन मोलमजुरी करून पोट भरावे लागत आहे. ज्यांना मोलमजुरी करणे शक्य नाही त्यांना भरपाईच्या आर्थिक मदतीवर उदरनिर्वाह करावा लागत आहे. ती पुंजी संपली तर पुढे काय? अशा चिंतेने दरडग्रस्तांचा दिवस मावळत असल्याचे बोलले जात आहे. तत्कालीन मुख्यमंत्री अनेकवेळा याठिकाणाहून गेले असतील, परंतु दोन वर्षे झाली तरी त्यांना दरडग्रस्तांची पुन्हा आठवण झालेली नाही. त्यामुळे अनाथांचा नाथ म्हणवाऱ्यांना इर्शाळवाडीतील अनाथांचा विसर पडल्याचे दरडग्रस्त आदिवासी बांधवांकडून बोलले जात आहे.

## लोकसंसद

### जुन्या रस्त्यांबरोबरच नवीन रस्त्यांवरही खड्डे!



यंदाच्या पावसातही मुंबईतील अनेक रस्त्यांची चाळण झाली असून अनेक ठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य तयार झाले आहे. रस्ते खड्डे मुक्त करण्यासाठी पालिकेकडून काँक्रिटीकरणाची कामे हाती घेण्यात आली होती. पण पावसाळा सुरू झाल्याने ही कामे थांबली आणि रस्त्यावर पुन्हा जागोजागी खड्डे दिसू लागले आहेत. विशेष म्हणजे जुन्या रस्त्यांवर खड्डे पडले आहेतच, पण नव्याने बनवण्यात आलेल्या रस्त्यांवरही काही ठिकाणी खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचून राहत असल्यामुळे खड्ड्याच्या लांबी, रुंदी, खोलीचा अंदाज येत नाही. त्यामुळे वाहनचालकांची त्रेधातिरपीट उडत आहे आणि खड्डे वाचविण्याच्या नादात अपघातांना निमंत्रण मिळत आहे. खरे तर दरवर्षीच्या पावसाळ्यातील रस्त्यांवरील खड्डे हे मुंबईकरांच्या पाचवीलाच पुजलेले आहेत. खड्ड्यांमुळे एखादा अपघात झाला आणि दुर्दैवाने प्राणहानी झाली की हा विषय प्रसारमाध्यमातून तावातावाने चर्चिला जातो आणि पावसाळ्यानंतर तो लोकांच्या विस्मृतीत जातो. अशा परिस्थितीत शालेय विद्यार्थी, महिला, दिव्यांग व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक अशा सगळ्याच असंख्य नागरिकांना रोजच अशा प्रकारे जीव मुठीत धरून खड्डेमय रस्त्यांवरून प्रवास करण्याशिवाय पर्याय उरत नाही. मुंबईच्या रस्त्यांवर पडणारे खड्डे बुजविण्यासाठी मुंबई महापालिका यंदा करदात्यांचे तब्बल १०४ कोटी रुपये खर्च करणार असल्याचे वाचनात आले. ते १०४ कोटी रुपये भ्रष्टाचाराच्या खड्ड्यात न जाता खरोखरचे खड्डे बुजविण्यासाठीच कारणी लागतील अशी नागरिकांना अपेक्षा आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## दिनविशेष

# प्रतिभावान गीतकार आनंद बक्षी

आनंद बक्षी हे एक हिंदी गीतकार व कवी होते. बक्षी यांचा जन्म २१ जुलै १९३० रोजी आताच्या पाकिस्तानमधील रावळपिंडी येथे काश्मीरी मोहयाल ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांची आई सुमित्रा आनंद बक्षी ते पाच वर्षांचे असताना वारली. त्यांचे कुटुंब भारताच्या फाळणी दरम्यान २ ऑक्टोबर, १९४७ रोजी भारतात आले. डकोटा विमानातून दिल्लीला आल्यावर बक्षी कुटुंब पुणे, मेरठ आणि शेवटी परत दिल्लीत येऊन स्थायिक झाले.

कविता हा त्यांचा जीव की प्राण. त्यांचे विश्वच निराळे. शब्दांच्या मळ्यात फिरणारे. त्यात त्यांच्या वाट्याला आली लष्करातली नोकरी.



लष्कराच्या कडक शिस्तीत शब्दांना अधिकच साचेबद्धता आली. ते रुक्ष वातावरण, तो युद्धाचा सराव, लष्करी कवायत अशा वातावरणात हा शब्दप्रभू कवितेच्या मळ्यात खुशाल बागडायचा. अंगच्या प्रतिभेने रुपेरी पडद्याच्या दालनात त्यांनी प्रवेश केला. त्यांनी रसिकांना जिंकले. कारण त्यांच्या शब्दांची जादूच तशी होती. त्यांच्या लेखणीतून उतरलेल्या गीतांनी तरुणाईला झिंग आणली. गायक व्हायचे आनंद बक्षींच्या मनात खूप होते. मात्र, त्यांच्यातील कविमनाने गायकीवर मात केली. ते गीतकार बनले आणि जन्माला आली तुमचे-आमचे जीवन फुलवणारी, अविस्मरणीय गाणी.

शब्दांच्या या जादुगाराने आपल्या गीतांनी रसिकांना जणू मोहिनीच घातली. प्रेमाची ओढ असो की विरह, आई- मुलातील वात्सल्य असो की मरणाची अपरिहार्यता असो, आनंद बक्षींच्या लेखणीने या सर्व भावना रसिकांच्या मनी ठसायच्या. १९५८ मध्ये आलेला 'भला आदमी' हा गीतकार आनंद बक्षींचा पहिला चित्रपट. 'धरती के लाल न कर इतना मलाल' हे त्यांचे पहिले गाणे. आनंद बक्षी प्रकाशझोतात आले ते 'जब जब फूल खिले'च्या गीतांमुळे. या चित्रपटात त्यांची लेखणी अशी खुलली की तिने रसिकांची मने काबीज केली. 'ये समा, समा है ये प्यार का' हे यातले लताच्या आवाजातले गाणे आजही ताजे, टवटवीत वाटते.

सहज ओठांवर येतील असे साधे, आशयघन शब्द, मनाला भावणाऱ्या शब्दांची यमकालंकारात केलेली सहज-सोपी गुंफण ही आनंद बक्षींच्या गाण्यांची वैशिष्ठ्ये. रसिकांच्या मनातले भाव नेमकेपणाने त्यांच्या गीतांत उतरायचे. मैत्री असो की द्वेष, प्रेम असो की मत्सर, वासल्य असो की कारुण्य, जीवनाचे तत्त्वज्ञान असो की फँटसी, आनंद बक्षींची लेखणी हे सारे भावविश्व चपखलपणे टिपायची. या सर्व भावना मग सुंदर गीतातून रसिकांच्या मनात रुंजी घालायच्या. संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांच्याबरोबर आनंद बक्षी यांचे सूर जुळले. कल्याणजी-आनंदजी, अन्नु मलिक, राजेश रोशन या संगीतकारांसाठीही आनंद बक्षी यांनी अनेक अविस्मरणीय गाणी दिली आहेत. अशा या महान गीतकाराचे ३० मार्च २००२ रोजी निधन झाले.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२१ जुलै

१) श्रीमती विमल गणपत भगत
कोळीवाडा, अलिबाग,
२१-७-२९४९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन





अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

## सुवर्णकण



जीवनाचा आनंद घेऊया
इतरांनाही आपल्या जगण्याने आनंद देऊया...!

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण.**

# मुंबईत अवघा ३५ टक्के पाऊस

## ● मे महिन्यातच धूमधडाक्यात आगमन; वार्षिक सरासरी २०९५ मिमी

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

**मुंबई शहर व उपनगरात मे महिन्यात पाऊस दाखल होऊनही आतापर्यंत म्हणजेच १७ जुलैपर्यंत शहरात अवघा ३५ टक्के पाऊस झाला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत तब्बल २२ टक्के पाऊस यंदा कमी आहे. गेल्या वर्षी १७ जुलैपर्यंत सरासरी ५७ टक्के पाऊस झाला होता.**



मुंबईत मे महिन्यातच पावसाचे धूमधडाक्यात आगमन झाले. जूनमध्येही जोरदार पाऊस झाला. मात्र, जुलैमध्ये पावसाचा जोर ओसरला. १७ जुलैपर्यंत शहर विभागात ३४.९८ टक्के तर उपनगरात ३४.३१ टक्के पाऊस झाला. २०२४ मध्ये १७ जुलैपर्यंत शहरात ५७.३८ टक्के तर उपनगरात ५४.५१ टक्के पाऊस झाला होता. त्यामुळे मुंबईत येणाऱ्या दोन महिन्यात मोठ्या पावसाची आवश्यकता आहे. जुलै अखेरीस व ऑगस्टमध्ये सर्वाधिक पाऊस पडण्याची शक्यता वेधशाळेकडून व्यक्त करण्यात येत आहे. मुंबई शहरापेक्षा उपनगरात पावसाचे प्रमाण अधिक असते. जूनमध्ये मोठा पाऊस झाल्याचे काही अपवाद वगळता जुलै ते ऑगस्ट या दोन महिन्यात शहरातील एकूण सरासरी पावसाच्या साधारणतः ६० टक्के पेक्षा जास्त पाऊस होतो.

२००७ मध्ये जुलै व ऑगस्ट या दोन महिन्यात ४७ टक्के पाऊस पडला होता. तर २००४ मध्ये या दोन महिन्यात ७८ टक्के पाऊस झाला होता.

महानगरपालिकेने शहराच्या विविध भागात लावलेल्या पर्जन्यजलमापक मोजणीच्या आधारे संपूर्ण शहरात आतापर्यंत ३२.५० टक्के पावसाची नोंद झाली आहे. यात ३० टक्के शहरात तर ३२ टक्के उपनगरात पाऊस झाला आहे.

### सरासरी पाऊस

मुंबई शहरात वार्षिक सरासरी २०९५ मिमी तर उपनगरात २,३१९ मिमी पाऊस होतो. आतापर्यंत शहरात ७३२ मिमी तर उपनगरात ७९५ मिमी पाऊस झाला आहे.

शहरात जोरदार पाऊस नसल्यामुळे नॅशनल पार्कमधील शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या तुळशी व विहार तलावातील पाणी पातळीतही हळुवार वाढ होत आहे. ही तलाव अन्य तलावांच्या तुलनेत लहान असल्यामुळे जुलै पहिल्या आठवड्यात ओसंडून वाहणे अपेक्षित असते. मात्र सध्या या तलावात ५२ ते ५३ टक्के इतकाच पाणीसाठा झाला आहे.

## कारगिल विजय दिवसाचे आयोजन

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

भारतीय सैन्यांनी सन १९९९ मध्ये कारगिल सेक्टरमध्ये झालेल्या ऑपरेशन विजयमध्ये पाकिस्तानी सैन्याच्या विरुध्द मिळविलेल्या विजयानिमित्ताने २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस साजरा करत असतात. या वर्षाचा कारगिल विजय दिवस दि. २६ जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता सैनिकी मुलांचे वसतिगृह, चिपळूण येथे साजरा करण्यात येणार आहे. यावेळी जिल्ह्यातील वीर नारी, वीरमाता, वीर पिता यांचा सन्मान करण्यात येणार आहे. तरी जिल्ह्यातील वीर नारी, वीरमाता, वीर पिता, माजी सैनिक/विधवा यांनी सैनिकी मुलांचे वसतिगृह चिपळूण येथे जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांनी केले आहे.

# विमानातून नेता येणार मौल्यवान रत्ने

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून आता निर्यातदार आपल्या बॅगेमध्ये सोन्याचे दागिने आणि मौल्यवान रत्ने बिनधास्त घेऊन जाऊ शकणार आहेत. जेम ॲण्ड ज्वेलरी एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिल (जीजेईपीसी) आणि मुंबई सीमा शुल्क विभागाच्या सहकार्याने निर्यातवाढीसाठी हे महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर ज्वेलरी हॅण्ड कॅरेज फॅसिलिटेशन सेंटर उभारण्यात आले आहे. देशातून होणाऱ्या सोने आणि मौल्यवान दागिन्यांच्या निर्यातीपैकी ६५ ते ७० टक्के निर्यात मुंबईतून होते. या सेंटरमुळे निर्यातवाढीस चालना मिळणार आहे. एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिलने मुंबई विमानतळावर भाड्याने जागा मिळवत निर्यातीच्या दृष्टीने सुसज्ज केली आहे. आता हा परिसर कस्टम क्षेत्र म्हणून अधिसूचित झाला आहे. भारत डायमंड बोर्सला कस्टोडियन म्हणून नियुक्त केले आहे. केंद्रातून चोवीस तास हाताने मौल्यवान दागिन्यांची निर्यात करता येणार आहे.

आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये मुंबई पोर्टमधून १,९६५ कोटी ३२ लाख ४० हजार कोटी डॉलरचे मौल्यवान खडे आणि दागिन्यांची निर्यात झाली होती. सरकारने दिलेल्या मंजुरीनंतर मुंबई विमानतळावरील टर्मिनल-२ मध्ये फॅसिलिटेशन सेंटर उभारण्यात आले आहे. आता येथून उच्च मूल्यदराच्या दागिन्यांची निर्यात बॅगमधूनही करता येणार आहे. व्यवसाय सुलभीकरणासाठी वेगवान मंजुरी दिली जाणार आहे. यासाठी मुंबई सीमा शुल्क विभाग, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा फोर्स, पोलीस, विमानतळ प्रशासनाच्या सहकार्याने एक खिडकी योजना करण्यात आली आहे. परराष्ट्र व्यापार धोरणात नमूद केलेल्या निवडक विमानतळांवरून रत्ने आणि दागिन्यांची वैयक्तिक वाहतूक करण्यास परवानगी आहे. निर्यातीसाठी, दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नई, कोची, कोईम्बतूर, बंगळूर, हैदराबाद आणि जयपूर येथे ही सुविधा आहे. आयातीसाठी, दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नई, बंगळूर, हैदराबाद आणि जयपूर येथे वैयक्तिक वाहतूक करण्यास परवानगी आहे.

> “निर्यातदार सदस्यांसाठी व्यवसाय सुलभता वाढवण्याच्या आमच्या प्रयत्नात हा मैलाचा दगड ठरणार आहे. ई-कॉमर्स निर्यात चॅनेलसह एमएसएमई आणि उच्च-मूल्य असलेल्या सामानाच्या वाहतुकीसाठी याचा फायदा होईल. संयुक्त अरब अमिराती (यूएई), ऑस्ट्रेलिया आणि ब्रिटन यासारख्या व्यापार भागीदार राष्ट्रांशी व्यापार करणे सुलभ होणार आहे.”
>
> - किरीट भन्साळी, अध्यक्ष, जीजेईपीसी

# ‘आधारकार्ड केंद्र कार्यान्वित करा’

**। म्हसळा । वार्ताहर ।**

म्हसळा तालुक्यात वर्षभर बंद असलेले आधारकार्ड केंद्र कार्यान्वित करण्याची मागणी शिवसेना उद्धव ठाकरे युवा संघटनेतर्फे म्हसळा तहसिल कार्यालयाकडे निवेदन देऊन करण्यात आली आहे. तसेच ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असलेले प्रतिज्ञापत्र सातत्याने तांत्रिक अडचणी येतात. ऑफलाईन करण्यात यावे अशी निवासी नायब तहसीलदार चंद्रशेखर खोत यांच्याकडे देण्यात आलेल्या निवेदनात ऑनलाईन प्रतिज्ञापत्र पद्धतीत फारच विलंब होत असल्याने नागरिक आणि विद्यार्थ्यांना गैरसोयीचे होते याबाबत निवेदन देण्यात आले.

दरम्यान, तालुकास्तरावर आधारकार्ड लिंक करून घेण्यासाठी अन्य तालुक्यात जावे लागते त्यामुळे आर्थिक भुर्दंड बसत आहे. नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी म्हसळा तहसिल कार्यालयाने कार्यवाही करावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.



नायब तहसीलदार चंद्रशेखर खोत यांच्याकडे निवेदन सादर करताना सुरेश कुडेकर, कौस्तुभ करडे, कृष्णा म्हात्रे, हेमंत नाक्ती, नरेश विचारे, राजेंद्र मोहिते, रमेश खोत तसेच अन्य पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शैक्षणिक साहित्याचे वाटप

**। उरण । वार्ताहर ।**

सीएचए शेवा सीएचए. आधार सामाजिक संस्थेच्या माध्यमातून (दि.१९) रोजी उरण, पनवेल आणि पेण विभागातील तब्बल १९ गावांतील २२ रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये एकूण २१७७ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. खोपटे, कोप्रोली, पाणदिवे, मोठीजुई, कळंबुसरे, चिरनेर, भोम, टाकीगाव, विंधणे, आवरे, पाले, पिरकोन, सारडे, कडापे, वशेणी, पुनाडे, केळवणे, दादर, दिघाटी आदी विविध गावांचा समावेश आहे. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. न्हावा शेवा सी.एच.ए.आधार सामाजिक संस्थेचे भरभरून कौतुक होत आहे.

# वायशेत येथे ‘हरित संवाद’ साजरा

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवायचे असेल, तर आजचा तरुण वर्ग नुसता पाहणारा नसून राष्ट्राचा सजग शिल्पकार झाला पाहिजे, असे आवाहन युवा कार्यकर्ते दर्श नागोटकर यांनी केले. वायशेत येथील हरित संवाद कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक भूमिकेतून ते संवाद साधत होते.




याप्रसंगी व्यासपीठावर मुख्याध्यापक वैशाली पाटील, नरेंद्र पाटील, ओएसिस संस्थेचे अध्यक्ष प्रतिक कोळी तथा शिक्षक वृंद उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनात ‘एक पेड माँ के नाम’ मोहिमेचे महत्व विषद करताना मातृप्रेम आणि पर्यावरणप्रेम यांचा संगम म्हणजेच ‘एक पेड माँ के नाम’ ही मोहिम असल्याचे नागोटकर यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी उपस्थितांनी एक पेड, माँ के नाम या उपक्रमात सहभागी होण्याची प्रतिज्ञा घेत विकसित भारतासाठी स्वतःला वाहून घेण्याची भावना व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किमया पाटील, प्रास्ताविक ओएसिस संस्थेचे अध्यक्ष प्रतिक कोळी तर आभार प्रदर्शन स्वाती धोदरे यांनी केले.

# संकेत गोताडची सैन्यदलात निवड

**। गुहागर । प्रतिनिधी ।**

कोतळूक शिगवणवाडी येथील संकेत गोताड याची नुकतीच सैन्य दलात निवड झाली आहे. त्याच्या निवडीबद्दल कोतळूक ग्रामपंचायतच्यावतीने सत्कार करण्यात आला.

अपयश पदरी आले तरी हार न मानता खडतर परिस्थितीतून मार्ग काढत संकेत शंकर गोताड याची निवड होऊन तो राजस्थान जोधपूर येथे कार्यरत झाल्याबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला.

संकेतने कोतळूक येथे चौथीपर्यंत जिल्हा परिषदेच्या



शाळेत त्यानंतर आबलोली येथे हायस्कूलमध्ये १० वी पर्यंत शिक्षण घेतल्यानंतर १२ वी पर्यंत शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर वेळणेश्वर येथील इंजिनिअर कॉलेजमध्ये मेकॅनिकल इंजिनिअर शिक्षण घेत असतानाच सैन्य दलात भरती होण्यासाठी सांगली येथे ॲकॅडमीत प्रवेश केला. त्याच्या या जिद्दीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

यावेळी त्याचे आई, बाबा, प्रगती मोहिते, शितल गोरिवले, सचिन ओक, सचिन भेकरे, सुनिल आगिवले, लक्ष्मण वरकर, समीक्षा वाघे, आसावरी बाधावटे, मनाली मोहित, कमलाकर शिरकर, पांडुरंग कावणकर, संचिता मोहिते, विनोद शिगवण, शमिका भेकरे, प्रताप देसले, वसंत गोरिवले, समीर ओक, राजेश आरेकर, अनिकेत आरेकर, कोतळूक शाळा नं. १ सर्व शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

## तळा येथे शेतकरी पुरस्काराचे वितरण

**। तळे । वार्ताहर ।**

रायगड प्रेस क्लबच्या माध्यमातून जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे सन्मान त्यांच्याच शेताच्या बांधावर जाऊन दरवर्षी केला जातो. त्याच धर्तीवर रायगड प्रेस क्लब तळा प्रेस क्लबच्या वतीने आदर्श शेतकरी पुरस्कार जयेंद्र पाशिलकर रा.गिरणे आणि सुचित पतारे रा.चरई बुद्रुक यांना गिरणे येथे शेताच्या बांधावर पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी चंद्रकांत राऊत, कैलास पायगुडे, नागेश लोखंडे, विजय तृपसौंदर्य, जितेंद्र टेंबे, किशोर मालुसरे, नितीन कदम, गिरीश कुलकर्णी, महेश शिंदे, दत्ता दुधाठे, संजय रिकामे, पुरुषोत्तम मुळे, किशोर पितळे, सागर पाटील, गोविंद किर्तने, सुभाष पाशिलकर, जयेंद्र पाशिलकर, सुचित पतारे गिरणे ग्रामस्थ पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते.

## भातलावणी अंतिम टप्प्यात



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यात भात लावणी अंतीम टप्प्यात आली आहे. पावसामुळे खार पट्ट्यात तसेच सखल भागातील शेती लावण्यात बळीराजा व्यस्त आहे. खरीप हंगामातील भात हे एकमेव पीक असल्यामुळे लावणीसाठी रोजंदारीवर महिला पुरुष शेतात राबतांना दिसत आहेत. जुन व जुलै महिन्यात ६८० मिमी पाऊस पडला असून आतापर्यंत १५०५ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे.

तालुक्यात ३३०० हेक्टर भात लागवडीचे क्षेत्र असून या क्षेत्रामध्ये सुवर्णा, जया, रूपाली, चिंटू, वाडा कोलम, रत्ना, शुभांगी, कर्जत इत्यादी भाताच्या जातीची लागवड केली जात आहे. आतापर्यंत तालुक्यात ८० टक्के लावणी पूर्ण झाली आहे, अशी माहिती सहायक कृषी अधिकारी मनोज कदम यांनी दिली आहे.

# ई-एज्युकेशनबाबत मार्गदर्शन शिबीर



**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथे ई-एज्युकेशन बाबत मार्गदर्शन करण्यात आले होते. सर्वदूर शिक्षण व जिल्ह्याचा शैक्षणिक विकास या ध्येयातून कार्य करणाऱ्या विरेश कोठारी व साई फाऊंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट मुंबईचे डॉ. असिफ कासकर यांच्या साई फाऊंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई व नाईटिंगल चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई यांच्या वतीने सदरील ई-एज्युकेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्य मार्गदर्शक संदेश गमरे यांनी विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करून ई-एज्युकेशनबाबतची माहिती दिली. यावेळी डॉ. असिफ कासकर, प्रथमेश शितकर, रितू प्रसाद, श्रुती सावंत, दिपक जगताप आदी मान्यवरांसह विद्यालयातील सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना वह्या वाटप

**। उरण । वार्ताहर ।**

सेवानिवृत्त आदर्श शिक्षक नरेश मोकाशी यांनी रायगड जिल्हा परिषद शाळा आवरे, गोवठणे, पाले, पिरकोण, पाणदिवे, वेश्वी, रानसई येथील सर्व विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप शुक्रवार (दि. १८) जुलै रोजी करण्यात आले. गावातील तसेच आदिवासी वाडीतील शाळांमध्ये सदर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी महेंद्र भोईर, बबन पाटील, निर्भय म्हात्रे, हेमंत गावंड, बळीराम पाटील, रविंद्र भोईर, अविनाश म्हात्रे बी. जे. म्हात्रे, का. र. म्हात्रे, विजय भोईर, नरेश भोईर, परशुराम पाटील, हि. सो. म्हात्रे, उर्मिला म्हात्रे, अरुणा तीरमाळी, सीमा कोल्हे, गणेश प्रसाद गावंड, पूजा चव्हाण तसेच शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमांचे सूत्रसंचाल निर्भय म्हात्रे यांनी केले होते.



# लायन्स क्लब कोलाडच्या अध्यक्षपदी रविंद्र लोखंडे



**। कोलाड । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यात तसेच कोलाड परीसरात लायन्स क्लब ऑफ कोलाडच्या नवीन टीमचा पदग्रहण सोहळा डॉ मंगेश सानप यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार( दि.१९) जुलै रोजी स्व.पा.रा.सानप कुणबी भवन रोहा येथे संपन्न झाला.

यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते नवीन अध्यक्ष म्हणून ॲड. रविंद्र लोखंडे याना अध्यक्ष म्हणून शपथ देण्यात आली.

सचिवपदी अलंकार खांडेकर, खजिनदार गजानन बामणे, उपाध्यक्ष डॉ श्याम लोखंडे, डॉ. विनोद गांधी, तर इतर सभासदांना विविध पदांसाठी संस्थापक अध्यक्ष डॉ. सागर सानप, माधव आग्री, नरेश बिरगावले, अनिल महाडिक, नंदकुमार कळमकर, दिनकर सानप, पूजा लोखंडे, रिया लोखंडे, अमिता बामणे, स्वरा महाडिक, शोभा खांडेकर, विश्वास निकम, दिलीप मोहिते, सह लायन मेंबर्स यांना विविध पदाचे पदग्रहनाची शपथ विजयकुमार गणात्रा यांनी दिली.

## ढिगारे कोसळून वाहतूककोंडी | भलत्याच ठिकाणी संरक्षक जाळ्या ठोकल्या

# माळशेज घाट ढासळू लागला

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

**भगवानगड येथे २०१२ मध्ये बस दरीत कोसळून माळशेज घाटात ३२ जणांचा बळी गेला होता. मात्र त्यानंतरही सुरक्षेच्या नावाने बोंबच असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. या घाटात धोकादायक दरडी सोडून भलत्याच ठिकाणी संरक्षक जाळ्या ठोकण्यात आल्या आहेत. त्यामुळे धो धो पावसात दरडी कोसळत असून भयंकर अपघाताची शक्यता आहे. त्यामुळे बांधकाम विभागाच्या ‘आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय कारभाराविरोधात संताप व्यक्त होत आहे.**



सावर्णेपासून एमटीडीसी जुन्नर हा १४ किमीचा रस्ता कल्याण-माळशेज घाटातून जातो. या रस्त्यावर वाहनचाल करताना पावसाळ्यात खड्ड्यातून वाट चुकवत कसरत करावी लागते, जागोजागी संरक्षण जाळ्या जीर्ण झाल्या असून काही कोसळल्या आहेत, पावसाळ्यात तसेच रात्री दाट धुक्यात रस्ता समजावा म्हणून पांढरे पट्टे देखील मारले गेले नाहीत. त्यामुळे नेहमीच अपघात घडत आहेत. रस्त्याच्या कडेला झाडेझुडपे वाढल्याने वाट दिसत नाही, त्यातच दिशादर्शक फलक गायब असल्याने धोक्याची वळणे समजत नाहीत. असे असताना नको त्या ठिकाणी जाळ्या बसविण्यात आल्याने धोकादायक ठिकाणाचे दगड, ढिगारे कोसळून वाहतूककोंडी होते. याबाबत वाहनचालकांनी अनेकदा आवाज उठवूनही बांधकाम खात्याचे अधिकारी कानाडोळा करत असून २०१२ सारखा पुन्हा मोठा अपघात घडल्यानंतर सरकारला जाग येणार का? असा सवाल केला जात आहे.

१५ जुलै रोजी घाटात दरड कोसळल्याने वाहतुकीसाठी हा मार्ग बंद करण्यात आला होता. मात्र असे धोकादायक हॉटस्पॉट अनेक ठिकाणी असल्याने अपघाताची शक्यता आहे. त्यामुळे सायंकाळी सहानंतर शक्यतो प्रवास टाळावा अशी सूचना राष्ट्रीय महामार्ग पोलीस विभागाकडून देण्यात येत आहे. प्रवाशांनी आणि वाहनचालकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पालीत आरोग्य केंद्राचा भोंगळ कारभार

## रुग्णाला ठेवले तीन तास ताटकळत; रुग्णवाहिका उपलब्ध नसल्याने संघर्ष

**| पाली | वार्ताहर |**

**सुधागड तालुक्यातील जनतेसाठी पालीमध्ये एकमेव आरोग्य केंद्र आहे. परंतु, रविवार (दि.२०) जुलै रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे उपचार घेण्यासाठी आदिवासी समाजाचे रोशन सत्यवान पवार हा रुग्ण दुपारी एक वाजता आला होता. त्याला गंभीर दुखापत झाली होती. मात्र, आरोग्य केंद्रात एकही डॉक्टर उपलब्ध नव्हता. आरोग्य केंद्रात केवळ दोन परिचारिका उपस्थित होत्या. डॉक्टर अभावी रुग्णाला तीन तास ताटकळत राहावे लागले.**



आरोग्य केंद्रात दोन डॉक्टर आहेत, त्यापैकी डॉ. प्रियंका गवळी या रजेवर आहेत तर डॉ. अभिजीत तळेकर यांचा मोबाईल बंद दाखवत होता. याबाबतीत परिचारिकांना विचारणा केली असता, आम्हाला डॉक्टर कुठे आहेत माहिती नाही असे सांगण्यात आले. दरम्यान, रुग्णाची परिस्थिती गंभीर असल्याने त्याच्या समवेत असलेल्या नातेवाईकांनी गोंधळ घातला.

पर्यायाने उपस्थित असलेल्या परिचारिकांनी खवली येथील डॉ. शुभम चिवेगावे यांना फोन करुन बोलावून रुग्णाची तपासणी करण्यात आली. रुग्णावर उपचार होणार नाही असे सांगून अधिक उपचारासाठी अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात त्याला पाठविण्यास सांगण्यात आले.

### खासगी रुग्णवाहिकेतून प्रवास

शासनाने नेमलेल्या १०८ व १०२ या नंबर वरील दोन्ही रुग्णवाहिका नसल्याने रुग्णाचे हाल झाले. पर्यायी त्यांना खासगी रुग्णवाहिका घेऊन प्रवास करावा लागला.

> “आम्ही ज्या-ज्या वेळी प्राथमिक आरोग्य केंद्रात येतो तेव्हा आम्हाला समस्यांना सामोरे जावे लागते. प्रशासनाने यावर ठोस उपाययोजना करावी.”
>
> – विश्वास वाघमारे
> अध्यक्ष आदिवासी समाज सुधागड

> “तालुका गटविकास अधिकारी म्हणून माझ्याकडे जेव्हा ही तक्रार आली. मी तात्काळ आरोग्य अधिकारी शशिकांत मडवी यांच्याशी संपर्क केला असता त्यांचा फोन बंद दाखवला. त्यानंतर मी, आरोग्य विस्तार अधिकारी धनंजय पाटील यांच्याशी संपर्क साधला व त्यांना सांगितले की तेथे तात्काळ डॉक्टर उपस्थित करा.”
>
> –लता मोहिते
> गटविकास अधिकारी सुधागड

## पालीत शांतता कमिटीची बैठक

**| पाली/वाघोशी | वार्ताहर |**

आगामी काळातील सण उत्सवानिमित्त (दि. १८) जुलै रोजी पाली पोलीस ठाणे येथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर यांच्या अधिपत्याखाली बैठक पार पडली. या बैठकीस आरिफ मनियार, अनुभव कुलकर्णी, धनंजय साजेकर, श्रीकांत ठोंबरे, रोहन दगडे, संजय घोसाळकर, अतिशय सागळे, किसन उमटे, गजानन शिंदे, सुमेश खैरे, राहुल गायकवाड, सुधीर साखरले, महम्मद घनसे, अब्बास बेनसेकर स्वप्निल गायकवाड, चंद्रकांत घोसाळकर, कृष्णा दिघे, रोहिदास सालेकर, रमेश जाधव, चंद्रकांत वाघमारे, मंगेश यादव, अमित गायकवाड उपस्थित होते.





अलिबाग तालुक्यातील सागवाडी येथील निसर्गाने नटलेल्या कोंडी धबधब्यावर पर्यटक व स्थानिक गर्दी करत आहेत. येथील स्थानिक कलाकारांनी या धबधब्यावरील दगडांवर काढलेल्या विविध चित्रांच्या कलाकृती येथे येणाऱ्यांना आकर्षण ठरत आहे. (छाया : समीर मालोदे)

## म्हसळा तहसीलदारांचे ई-केवायसी करण्याचे आवाहन

**| म्हसळा | वार्ताहर |**

महाराष्ट्र शासन अन्न धान्य वितरणप्रणाली अंतर्गत शिधापत्रिकेतील सर्व सदस्यांनी ई-केवायसी करणे शासनाने अनिवार्य केले आहे. त्यामुळे शिधापत्रिकेत नावे असलेल्या प्रत्येक सदस्य लाभार्थ्यांनी आपल्या गावातील किंवा नजिकच्या परिक्षेत्रातील रास्त भाव धान्य दुकानात जाऊन तेथे उपलब्ध करून दिलेल्या ई-पॉस डिजिटल यंत्रामध्ये आधार क्रमांक सिडींग करून घ्यावयाचा आहे.



अवघ्या काही सेकंदाची ही प्रक्रिया असून ई-केवायसी पूर्ण झाल्यावरच आगामी काळात लाभार्थ्यांच्या नावाने धान्य वितरणाचा लाभ देण्यात येणार आहे. प्रत्येक धान्य दुकानात ई-केवायसी प्रक्रिया निशुल्क सुरू आहे. स्वस्त धान्य दुकानातील पॉस मशीनवर अंगठ्याचा ठसा देऊन शिधापत्रिकेतील प्रत्येक सदस्य लाभाथ्यानी ई- केवायसी करून घ्यावे. ज्या सदस्य लाभाथ्यांनी ही प्रक्रिया पूर्ण केली नाही त्यांचे धान्य बंद होणार आहे. त्यामुळे कोणीही लाभार्थी अन्न धान्यापासून वंचित राहणार नाही.

शिधापत्रिकेतील प्रत्येक सदस्य लाभाथ्यानी ई -केवायसी करून घ्यावी, असे आव्हान म्हसळा तहसीलदार सचिन खाडे यांनी केले आहे.

## लायन्स क्लबतर्फे आरोग्य तपासणी

**| मुरुड-जंजिरा | वार्ताहर |**

लायन्स हेल्थ फाऊंडेशनांच्या सहकार्याने लायन्स क्लब अलिबाग-पोयनाड व लायन्स क्लब मुरुड जंजिरा यांच्या विद्यमाने मुरुड तालुक्यातील यशवंतनगर पंचक्रोशीत नेत्र तपासणी, नेत्रबिंदू शस्त्रक्रिया, व आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. पंचक्रोशीतील सुमारे १०३ रुग्णांनी याचा लाभ घेतला.

या कार्यक्रमाचे आयोजन आगरी समाज गृह येथे करण्यात आले होते. या शिबिरात १६ मोतीबिंदूचे रुग्ण आढळले असून त्यांना पुढील उपचारासाठी चोंढी येथे लायन्स क्लबच्या हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात येणार आहेत. यावेळी शुगर, रक्तदाब, पित्त, थायरॉईडची तप-ासणी करण्यात आली.

याप्रसंगी गुरुनाथ माळी, अनिल म्हात्रे, सुरेश देशमुख, मनिषा बर्गे, मंगेश बर्गे, विलास मोहिते, गिरीश म्हात्रे, प्रियदर्शनी पाटील, सनी सोगांवकर, प्रशांत मिसाळ, नरेश कुबल, जमीर बकवाल आदी उपस्थित होते. मुरुड पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक परशुराम कांबळे, अर्चना खोत यांनीही शिबिराला भेट देऊन या उपक्रमाचे कौतुक केले.



## नक्ष पाटीलचे स्कॉलरशिप परिक्षेत यश

**| रेवदंडा | वार्ताहर |**

अलिबाग तालुक्यातील आंदोशी गावाचा नक्ष कैलास पाटील यांनी नवोदय व स्कॉलरशिप परिक्षेत यश मिळवित अलिबाग तालुक्यात प्रथम येण्याचा मान पटकाविला आहे. महाराष्ट्र राज्य परिषद पुणे यांचे वतीने आयोजीत पुर्व उच्च प्राथमिक शाळा शिष्यवृत्ती परिक्षेत एकूण ८० टक्के गुण मिळवीत ग्रामीण विभागात शिष्यवृत्तीधारक बनला आहे. गुणवत्त विदयार्थ्याचा केंद्र प्रमुख कृष्णकुमार शेळके यांनी सत्कार करून सन्मान केले. तसेच केंद्रातील विविध शाळेतील शिक्षकांनी व मुख्याध्यापकांनी त्यांचे अभिनंदन केले. केंद्र शासन संचलित नवोदय विदयालयात इयत्ता ६ वीच्या प्रवेश परिक्षेत तो प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाला आहे. त्यांच्या यशाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

### दिवंगत पदाधिकाऱ्यांचा स्मृती जागर

**तळा** : तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द .ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, गो. म. वेदक विद्यामंदिर, प्राथमिक विद्यामंदिर व डॉ. प्र. म. जोशी प्रशाला पन्हेळी-गायमुख यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीकृष्ण प्रभाकर देशमुख यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून संस्थेच्या सर्व दिवंगत पदाधिकाऱ्यांचा जागर व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त मारुती शिर्के, अध्यक्ष चंद्रकांत रोडे, उपाध्यक्ष पुरुषोत्तम मुळे, प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव, दिलीप ढाकणे, सचिन भाटे तसेच तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## कर्तव्यदक्ष कर्मचाऱ्याला अविस्मरणीय निरोप

### नथुराम लोभींची प्रधान तंत्रज्ञ म्हणून बढतीसह बदली



**| चौल | प्रतिनिधी |**

महावितरणच्या चौल १ विभागात कार्यरत असलेले कर्तव्यनिष्ठ आणि मनमिळाऊ सहाय्यक लाईनमन नथुराम कृष्णा लोभी यांना प्रधान तंत्रज्ञ म्हणून बढती मिळाली असून, त्यांची बदली विभागीय कार्यालय चरी पळी येथे झाली आहे. त्यांच्या सन्मानार्थ चौल महावितरण विभागातील कर्मचाऱ्यांच्यावतीने निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम चौल येथे पार पडला. या कार्यक्रमासाठी चौल विभागीय कार्यालयाच्या सहाय्यक अभियंता रेणुका पत्की-कुलकर्णी या आवर्जून उपस्थित होत्या. सर्वप्रथम त्यांच्या हस्ते लोभी यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. दरम्यान, लोभींनी त्यांच्या कार्यकाळात वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी वेळोवेळी दाखविलेली तत्परता, संकटसमयी उभं राहणं आणि गावाशी जोडलेली आपुलकी याबद्दल रेणुका पत्की-कुलकर्णी यांनी मनापासून कौतुक केले. या कार्यक्रमासाठी चौल विभागातील महावितरणचे कर्मचारी अमोल राणे, प्रवीण शेळके, शीतल रायकर, विशाल कवळे, मंगेश मढवी, सूरज गावंड, वरुण ओरपे, धनंजय आरकिल्ले, साक्षी भोनकर, सिद्धांत खंडारे, सुधर्म मुकादम आदी उपस्थित होते. उपस्थित सर्व सहकार्य कर्मचाऱ्यांनी लोभी यांच्या कार्याला मनापासून सलाम केला. संपूर्ण कार्यक्रम कर्मचाऱ्यांच्या प्रेम, सन्मान आणि कृतज्ञतेच्या भावनेने भरलेला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल राणे यांनी केले. तर प्रवीण शेळके यांनी आभार मानले.

### मशागतीसाठी पॉवर टिलरचा वापर | खरेदीसाठी शासनाकडून अनुदान

# लाकडी नांगर कालबाह्य होण्याच्या मार्गावर

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

**ग्रामीण भागातला खेड्यापाड्यातील शेतकरी म्हटला म्हणजे त्यांच्याकडे डौलदार बैलांची जोडी, लाकडी नांगराच्या एक दोन जोड्या, बैलगाडी असणारच तरच तो शेतकरी शोभतो. एकदा जून महिना उजाडला की शेतकरी जमीन मशागतीसाठी नांगर दुरुस्ती करणे, नवीन नांगर तयार करणे, एखादा बैल कमी असल्यास बैल शोधणे, नवीन बैल खरेदी करणे, नांगरासाठी लागणाऱ्या फाळीसाठी मजबूत लाकूड शोधणे अशा कामांची शेतकऱ्यांची लगबग सुरू होते.**



नांगर मजबूत टिकाऊ असावा यासाठी शेतकरी साग, खैर, शिसव, शिवण यासारख्या लाकडाचा वापर करतात. ग्रामीण भागातील शेतकरी आता मशागतीच्या कामासाठी पॉवर टिलर वापर करू लागला आहे. पूर्वीच्या काळात शेतकरी लावणी, नांगरणी, पेरणी आदी कामासाठी एकमेकांच्या शेतात जाऊन मदत करत असत. परंतु आता मजुरांची टंचाई आणि पावसाचा अनियमितपणा यामुळे प्रत्येक शेतकरी आपल्या परीने आपली शेतीची कामे करतात. पॉवर टिलर भाड्याने घेणाऱ्या शेतकऱ्यांना सातशे रुपये प्रति तास या भावाने पैसे मोजावे लागतात. त्यामुळे बरेच शेतकरी शेतीच्या कामासाठी लाकडी नांगराऐवजी लवकरात लवकर काम पूर्ण करण्यासाठी पॉवर टिलर वापरत आहेत. पॉवर टिलरच्या वापरामुळे लाकडी नांगर शेतकऱ्यांना आता जास्त खर्च होतो. कामे वेळेत होतात. सध्या बाजारात गावरान एका बैल जोडीची किंमत ५० ते ६० हजारांवर पोहोचली आहे. तसेच भाडेतत्त्वावर बैल जोड्याही मिळत नाहीत. त्याचप्रमाणे वर्षभर बैलांची राखण करणे, निगा राखणे त्यांना खाद्य पुरविणे आदी बाबी वर्षभर शेतकऱ्यांना कराव्या लागतात. तसेच पॉवर टिलर व ट्रॅक्टर खरेदीसाठी शेतकऱ्यांना व महिला बचत गटांना ५० टक्के ते ७५ टक्के अनुदान शासनाकडून मिळते. त्यामुळे शेतकरी शेतीच्या कामासाठी लाकडी नांगराऐवजी पॉवर टिलरकडे वळताना दिसत आहे.

> “लाकडी नांगराऐवजी पॉवर टीलरचा वापर केल्याने शेतकऱ्यांचा वेळ, पैसा तसेच शारीरिक श्रम देखील वाचतात. साधारणपणे पॉवर टिलर दोन अडीच तासात दोन एकरावर जमीन नांगरते. त्यामुळे नांगराच्या तुलनेत कमीत कमी वेळात जास्त जमीन नांगरली जाते.”
>
> –प्रफुल्ल खारपाटील,
> शेतकरी तथा कृषीमित्र

## निवडक



### मधुकर ठमके, महादेव डाकी यांना आदर्श शेतकरी पुरस्कार प्रदान

**नागोठणे** : रायगड प्रेस क्लबच्या माध्यमातून अनेक वर्ष जिल्ह्यातील शेतीनिष्ठ प्रगत शेतकऱ्यांचा सन्मान त्यांच्या शेतावर जाऊन करण्यात येत असतो. त्या अनुषंगाने नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनतर्फे शुक्रवार (दि.१८) जुलै रोजी नागोठण्याजवळील पळस येथे रायगड जिल्हा समन्वय व सनियंत्रण (दिशा) समितीचे सदस्य शिवरामभाऊ शिंदे यांच्या प्रांगणात नागोठणे विभागातील बाळसई येथील ७८ वर्षीय शेतीनिष्ठ शेतकरी मधुकर ठमके व शेतपळस येथील ७५ वर्षीय शेतीनिष्ठ शेतकरी महादेव डाकी यांना आदर्श शेतकरी पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे, नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी, रोहा तालुका कृषी अधिकारी महादेव करे, रोहा पं. स. कृषी अधिकारी रणजित लवटे, नरेश झुरे, नरेंद्र जैन, सदानंद गायकर, डॉ. राजेंद्र धात्रक, सुप्रिया महाडिक, सुप्रिया डाकी, डॉ. मिलिंद धात्रक, विलास चौलकर, हिराजी शिंदे, मारुती शिर्के, निष्ठा विचारे, कांचन राऊत, भावना गिजे, अमृता महाडिक, किसन बोरकर, सतिश डाकी, अनंत साळुंखे, वामन डाकी, गणपत डाकी, राम जोशी, एस. टी. पाटील, काशिनाथ जाधव आदी मान्यवरांसह नागोठणे पत्रकार असोसिएशनचे संस्थापक शामकांत नेरपगार, अध्यक्ष ॲड. महेश पवार, अनिल पवार, किशोर कदम, विनोद भोईर, दिनेश ठमके, चेतन टके, सचिन नेरपगार, राजेश पिंपळे, मंजुळा म्हात्रे, वर्षा सहस्त्रबुद्धे आदी उपस्थित होते.



### करिअर संसदेचा शपथविधी

**उरण** : कोकण ज्ञानपीठ उरण कॉलेजमध्ये 'करिअर कट्टा अंतर्गत करिअर संसदेचा' शपथविधी सोहळा पार पडला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी मंत्रीमंडळ स्वरूपात जबाबदाऱ्या स्वीकारून लोकशाही मूल्यांची शपथ घेतली. शपथविधी प्राचार्य डॉ. वाल्मीक गरजे यांनी दिली. यावेळी त्यांनी या करिअर संसदेचा उपयोग भावी आयुष्यात नेतृत्व विकासासाठी मोलाचा ठरेल असे सांगितले. विद्यार्थी मंत्रीमंडळ करिअर कट्टा २०२५, प्राप्ती पांगुल, आरती पाटील, अथर्व महाकाळ, सिद्धी पाटील, उन्मेश महाकाळ, हर्षल मोढवे, मयुरी पाटील, कनिक्षा पाटील, मृणाल कोळी, हेमांकी फळसंकर, शार्दुल गायकवाड, प्रथमेश अधिकारी या विद्यार्थ्यांनी पदाची व गोपनीयतेची शपथ घेतली तसेच महाविद्यालयाची शिस्त व विकास यासाठी कटिबद्ध राहूम कार्य करीन असे मान्य केले. या शपथविधी सोहळ्यास प्रा. व्ही. एस. इंदुलकर, प्रा. डॉ. एम. जी. लोणे महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजन प्रा. डॉ. ए. आर. चव्हाण यांनी केले.



### अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशनतर्फे वाडगाव येथे आरोग्य तपासणी

**अलिबाग** : रायगड फोटोग्राफर ॲण्ड व्हिडीओ ग्राफर्स असोसिएशन शी संलग्न असलेल्या अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशन आणि अलिबाग- मुरुड मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने वाडगाव येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी व भारती डायग्नोस्टिक च्या वतीने रक्टगट तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अलिबाग-मुरुड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. वैभव भगत, डॉ. अमेय केळकर, डॉ. ओमकार पाटील, डॉ. वैजेश पाटील, डॉ. समीर धाटावकर, डॉ. गणेश गवळी, डॉ. निशिकांत ठोंबरे, डॉ. भूषण शेळके, डॉ. संकेत मोरे, डॉ. यांनी विद्यार्थ्यांची कान, नाक, घसा, छाती, पोट, हृदयाचे ठोके, रक्त प्रमाण, दातांची तपासणी करून मोफत औषधं दिली. या शिबीरात एकूण ६३ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी व रक्टगट तपासणी करण्यात आली.

यावेळी भारती डायग्नोस्टिकचे राकेश थळे, रायगड फोटोग्राफर्स ॲण्ड व्हिडीओग्राफर्स असोसिएशनचे उपाध्यक्ष समीर मालोदे, खजिनदार जितेंद्र मेहता, सुगंधा पाटील, चंद्रकांत काटकर, नितीन पाटील, संध्या कडू, सरिता भगत, बापदेव, प्रभाकर भगत, सारिका पवार, प्रवीणा भगत, जयेंद्र भगत अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशनचे अध्यक्ष तुषार थळे, विकास पाटील, विवेक पाटील, सुरेश खडपे, अमर मढवी, अभिजित काटकर, विजय पाटील, गणेश जाधव, योगेश सावंत, सुनील भगत व विद्यार्थी उपस्थित होते.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- पिक-अप ४०७, आयशट डंपर वरील ड्रायवर पाहिजे आहेत झिराड आणि मांडवा येथील संपर्क : ८८०६६८३२३२ /८००७८९३२३२
- अलिबागमधील ऑफिसकरीता सिवील सुपरवायझर. civil engineer व ड्राफ्टसमन पाहिजे. मो.नं. ९९७०३९१६९७
- गोंधळपाडा येथील गृहप्रकल्पाकरीता अनुभवी सिव्हील इंजिनिअर/साईट सुपरवाइजर पाहिजेत. संपर्क- ९५९५०४१६१२/८१८०८६१२३४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# रायगडच्या प्रगतीत बँक ऑफ इंडियाचा वाटा

## • जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे प्रतिपादन

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**बँक ऑफ इंडियाच्या रायगड विभागातर्फे अलिबाग येथे किसान दिन मोठ्या उत्साहात जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना आधुनिक शेती, शासकीय योजना आणि बँकेच्या योजनांचे लाभ घेण्याचे आवाहन केले.**



बँक ऑफ इंडिया तर्फे बँक राष्ट्रीयीकरणाच्या स्मृती प्रित्यर्थ १९ जुलै हा दिवस किसान दिवस किसान दिवस आणि जुलै महिना किसान माह म्हणून साजरा केला जातो.या दिवशी बँकेच्या भारतातील आणि रायगड जिल्ह्यातील सर्व शाखांमध्ये शेतकरी, कष्टकरी आणि महिला यांचा सन्मान करून त्यांना कर्ज वाटप केले जाते. या कार्यक्रमास मुख्य महाव्यवस्थापक सुनील शर्मा, एफ.जी.एम.ओ. मुंबई दीपान्विता साहनी-बोस, विभागीय व्यवस्थापक, रायगड विभाग, प्रकल्प संचालक, प्रियदर्शिनी मोरे, उप विभागीय व्यवस्थापक बिरेन चटर्जी, उप विभागीय व्यवस्थापक भरत सहाय, अग्रणी जिल्हा व्यवस्थापक, रायगड विजय कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

बँक ऑफ इंडिया ही फक्त नावाला रायगड जिल्ह्याची अग्रणी बँक नसून सर्व कामात पहिल्या क्रमांकावर राहणारी बँक आहे असे कौतुक जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी यावेळी केले. या कार्यक्रमात सामाजिक सुरक्षा योजने अंतर्गत लाभ घेतलेल्या व मृत्यू पावलेल्या २ लाभार्थींच्या वारसदारास २-२ लाख रुपयांच्या धनादेशचे वाटप करण्यात आले.

मुख्य महाव्यवस्थापक सुनील शर्मा यांनी कृषी वित्त पुरवठ्यासाठी बँकेचा पाठिंबा आणि तयारी असल्याचे सांगताना बँकेच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन उपस्थिताना केले त्याच बरोबर जिल्हा प्रशासन बरोबर योग्य समन्वय राखून केंद्र आणि राज्य शासनाच्या सर्व योजना राबवण्यात बँक ऑफ इंडिया नेहमीच अग्रेसर राहील याबाबत उपस्थितांना आश्वासन दिले.

विभागीय व्यवस्थापक दीपन्विता सहानी बोस यांनी उपस्थितांचे स्वागत करून कृषी, एम.एस.एम.ई. आणि रिटेल फायनान्स मधील बँकेची भूमिका आणि शासकीय योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी दिलेल्या समर्थनाबद्दल सविस्तर माहिती दिली. प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे यांनी जिल्ह्यातील बचत गट वित्तपुरवठ्यात बँक ऑफ इंडियाच्या ८० टक्के पेक्षा जास्त योगदानाचे कौतुक केले.मान्यवरांच्या हस्ते विविध योजनांच्या लाभार्थ्यांना मंजुरी पत्रे वाटप करण्यात आली.अग्रणी जिल्हा व्यवस्थापक कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधिर गायकवाड यांनी केले.



# विलास फडके यांच्या वाढदिवसानिमित्त वह्या वाटप

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

विहिघरचे सुपुत्र आणि रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विलास फडके यांच्या वाढदिवसानिमित्ताने पनवेल तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा नेरे आणि नेरे हायस्कूल येथे शेकडो विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले.

यावेळी माजी कृषी उत्पन्न उप सभापती बाळकृष्ण शिवा गवते, माजी कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक मेघनाथ (नाना) म्हसकर, नेरे ग्रामपंचायत सदस्य शैलेश पाटील, ग्रामपंचायत सदस्या ॲड मनीषा गायकर, ग्राम पंचायत सदस्या सविता चोरघे, नेरे ग्रामपंचायत सदस्या प्रगती फडके, मुख्याध्यापक दमाजी धोत्रे, प्रनोती भावसरे, सी.के. पाटील आणि शिक्षक यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# रोटरी क्लबकडून सोलर पॅनल

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

रोटरी क्लबकडून कर्जत तालुक्यातील शेलू आणि कळंब या जिल्हा परिषद शाळेत सोलर पॅनल बसविण्याचा उपक्रम राबविण्यात आला. या सोलर पॅनेलचे उद्घाटन डॉ. मनिष मोटवानी, अलका मुरली यांच्या हस्ते करण्यात आले.

मुंबई येथील देवनार रोटरी क्लब आणि कर्जत ग्रामीण रोटरी मंडळ यांच्या माध्यमातून कर्जत तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांना विजेचा आर्थिक भार कमी करण्यासाठी सोलर पॅनल बसवून देण्याचा प्रयत्न सुरु आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून शेलू आणि कळंब येथील शाळेच्या छपरावर सोलर पॅनल बसविण्यात आले. यावेळी डॉ. मनिष मोटवानी, सतीश शाह, सी के. मोहन, कन्नन, कुलभुषण जेटली, सुरेदनाथ, गटशिक्षणाधिकारी अनंता खैरे, रेखा हिरेमठ, बागडे, डॉ. रूपेश सोनावळे, संतोष बदे आदी उपस्थित होते.

# बजरंग दल अभ्यासवर्गाचे मुरुड येथे आयोजन

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

विहिंप रायगड जिल्हा मुरुड प्रखंड कोकण प्रांत बजरंग दल अभ्यास वर्गाचे दोन दिवसीय आयोजन मुरुड येथील हिंदू एज्युकेशन सोसायटी मध्ये बजरंग दल विभाग मंत्री ॲड. अनिकेत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.



उद्घाटन प्रसंगी बजरंग दल जिल्हा मंत्री जितेंद्र करंजकर, जिल्हा उपाध्यक्ष संतोष भोईर, जिल्हा संयोजक किरण काकडे, हिंदू एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष दिलीप जोशी, ग.रा. पाटील, सुनिल विरकुड, प्रा. अनुप सिंह आदी मान्यवर उपस्थित होते. सुरक्षा, संस्कार सेवा आणि संस्कृती या विषयावर ॲड. अनिकेत ठाकूर यांनी शिबिरार्थींना मागदर्शन केले. अभ्यास वर्गात, मुक्त चिंतन, संस्कार क्षम कार्यकर्ता आदींवर मुक्त चर्चा करण्यात आली तसेच मैदानी खेळांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. दिलीप जोशी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या १०० वर्षांचा कार्याचा आढावा घेत कार्यकर्त्यांच्या योगदानामुळे हे शक्य झाल्याचे सांगुन हिंदू समाज संघटितपणे उभा राहण्यासाठी संघाचे हे ईश्वरी कार्य निष्ठेने आणि जिद्दीने पुढे नेण्याचे आव्हान स्वीकारावे असे आवाहन केले.

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे सालपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक अनंत हरी सोनावळे यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे सालपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार ( रू. पै.) |
|---|---|---|---|
| ६६ | ४ | १-४५-१० पैकी खरेदी करणेचे क्षेत्र ०-२०-०० | १-७१ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. २१/०७/२०२५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.९४२२०६८७५५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक रोमा मिलिंद अंतानी यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे- कडाव तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ९६/४ | एकुण क्षेत्र ०-२४- ५० हे आर पॉ | ०-८७ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक २१/०१/२०२५

खरेदीदारा तर्फे वकील ॲड. वृषाली रघुनाथ मोरे मोबा. ८५३०१४६८५४
खरेदीदारा तर्फे वकील ॲड. निलेश कान्हू मोरे मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९. तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - अंत्राट तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| अंत्राट तर्फे वरेडी | १०५ | ३/अ | ०-८२-०० | ० | ६० |

वरील मिळकतीपैकी खरेदी देणार श्री. रामचंद्र मारुती सोनावळे यांचे मालकीचे क्षेत्र हे.-आर.- पॉ. ०-४००० आकार ०.२९

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही/-
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, पहिला मजला, **ॲड. निलेश दामु मुंढे**
गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालिका शेजारी, दिनांक : २१/०७/२०२५
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१ मो. नं. ८४४६८६९६७१
ई मेल :-nileshmundhe029@gmail.com

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते, की आमच्या अशिलाने मौजे भोस्ते ता. श्रीवर्धन जि. रायगड येथील

| अ.क्र. | गट क्र. | जुना सर्वे नं. | एकूण क्षेत्र | आकार | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | १७१ | १७/१ | ०६-२५-०० | २-७६ | श्री. हिदायतुल्ला अलीमिया फिरफिरे<br>श्री. अल्लाउद्दीन अलीमिया फिरफिरे<br>श्री.अ.वहाब अलीमिया फिरफिरे<br>श्री. हुसैन अलीमिया फिरफिरे<br>श्रीम. दिलशाद निसर अहमद मोजर<br>श्रीम. लतिफा समीर कौचाली |

यांचेकडून जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेण्याचे बोलीसह सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याबाबत मिळकत मालकाचे म्हणणे असून ती त्यांच्या आजपर्यंत ताबे कब्जात व वहीवाटीत आणि मालकी हक्कात असून प्रत्यक्ष कसवणुकीखाली आहे. सदर जमीन खरेदीसाठी आमचे अशिलांनी आवश्यक त्या संबंधित सरकारी कार्यालयाकडून योग्य ती सर्व परवानगी मिळवून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. वरील मिळकतीच्या बाबत कुणाचीही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, अखत्यार पत्र, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टी, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लीन, लीज, बक्षीसी, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमूद मिळकतीच्या हद्दी खुणावरून कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत संबंधितांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित (सक्षम अथवा रजिस्टर पोस्टाने) खाली सही करणारे वकील यांच्याकडे पाठवावे व वकिलांची खात्री पटवून द्यावी.

विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे. असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतेही हक्क व हितसंबंध नाहीत. व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरून आमचे अशिल संबंधित मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाची हरकत आमचे वर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

स्थळ : श्रीवर्धन
दि. २१/०७/२०२५ सही/-
कार्यालयीन पत्ता **(ॲड. संतोष मारुती सापते)**
रा. ग. स. कातकर सभागृह, बीएससी. एल. एल. बी. एम ए बी एड
गाळा नं २ वाणी आळी डिप्लोमा इन सायबर
श्रीवर्धन ता. श्रीवर्धन जि. रायगड


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक



## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविणेत येते की, मौजे बांधिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील ग्रुप ग्रामपंचायत शेलु मालमत्ता क्र. ३७२४ ही मिळकत व त्या खालील एकुण २५०० चौ. फुट क्षेत्राची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक व कब्जेदार श्री. राहुल बळीराम तरे यांचेकडुन आमचे अशिलांनी विकसनासाठी घेणेचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, मृत्युपत्रांकीत दान, साठेकरार, विकसन करार, बयाणा पावती, ताबाकब्जा, वहिवाट, पोटगी, लीन, चार्ज, भाडेपट्टा, जाणे येणेचे मार्ग, वारसाहक्क वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार विकसनकार तर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यांसह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचे आमचे अशिल समजतील. तसेच कोणाचीही हरकत असल्यास ती त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिली आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे विकसनाचे काम पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमचे अशिलांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पत्ता:-'श्रीसद्गुरूकृपा', १४४ अ, **ॲड. संदिप गोपाळ बागडे**
मु. पो. शेलु, ता. कर्जत, जि. रायगड. विकसनकार तर्फे ॲडव्होकेट
मो. ९८६०६२६२४६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल श्री. कुणाल सुभाष सोनावणे यांनी त्या मिळकतीचे मालक श्री. परशुराम विठु मेंगाळ यांचेकडून खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे नांदगाव, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| ४४ | १/फ | ०.८६.०० | ०.८५ |

तदंगभुतः सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबा-कबजा, कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्यूपत्रांकितदान, गहाण, बक्षीस, फरोक्त , लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत सकृत दर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख - २१-०७-२०२५ **ॲड.दिपाली राहूल शिंदे**
बी.एल.एस, एल. एल. बी,
ॲडव्होकेट व नोटरी,
मो. नं - ९५६१७१९४९४
९०११७१६००१

सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(वाटपपत्र / करारनामा)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजने अंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे इरादापत्र दिले असून **वाटपपत्र/करारनामा** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | नोड व संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र हे.आर. | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यःस्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **ता.पनवेल, जि.रायगड** | | | | | | | | |
| १ | उलवे ४३२ | गव्हाण ५५३ | ३४/१२<br>३३/६<br>३१/९<br>३१/७<br>३०/१४ | ०-५-०<br>०-३-०<br>०-५-१<br>०-१-८<br>०-२-८ | | उलवे नोड येथील भूखंड क्र. १०A, सेक्टर-२२, क्षेत्र-२९९.७० चौ.मी. | मूळ भूधारक कै. अनुबाई लक्ष्मण कोळी (मयत), कै. महादेव लक्ष्मण कोळी (मयत) यांचे वारस १) श्री. हडकू उर्फ हरिश्चंद्र लक्ष्मण कोळी, २) श्रीमती नर्मदा कुंडलिक कोळी, ३) श्रीमती मंजुळा महादेव नाईक, ४) श्री. राजेश महादेव नाईक, ५) श्री. नरेश महादेव नाईक, ६) कु. कांचन महादेव कोळी, ७) श्रीमती गीता एकनाथ कोळी व ८) श्रीमती ज्योती संतोष पाटील | -- |
| | | गव्हाण ६४५ | २४५/१ | ०-०५-८ | | | | |
| | | गव्हाण ६४५ | १८/७ | ०-०९-७ | | | | |
| २ | उलवे १९१२ | दापोली १०७-१ | ६/२<br>७९/६<br>१०९A/६<br>११२/१२<br>२९/१<br>९९/२ | ०-२-०<br>०-८-०<br>०-२९-०<br>०-६७-०<br>०-२-५<br>०-१५-० | ११०० | उलवे नोड येथील भूखंड क्र.२A, सेक्टर-१०B, क्षेत्र-१०९९.७२ चौ.मी. | रे.मु.क्र. १२०/२०१४ मधील दिनांक १६.१२.२०२३ रोजीचे आदेश व वारस दाखला क्र. १४९६/२०२४ विचारात घेता १) श्री. कृष्णा उर्फ किसन बाळा कुडावकर, २) श्री. महादेव बाळा कुडावकर, ३) श्रीमती चांगुना भगवान जितेकर, ४) श्रीमती यशोदा हनुमान घोपरकर, ५) श्रीमती सुरेखा दिलीप घरत, ६) श्रीमती अनुसया नारायण कुडावकर, ७) श्री. अशोक नारायण कुडावकर, ८) श्रीमती सपना वासुदेव पाटील, ९) श्रीमती सुनंदा रमेश भगत, १०) श्री. किशोर नारायण कुडावकर, ११) श्री. सुर्यकांत नारायण कुडावकर, १२) श्रीमती राजश्री राजेश ठाकूर, १३) श्रीमती मनाली महेश कोकंबे, १४) श्रीमती सुचिता सतिष पाटील, १५) श्री. रजनिकांत जनार्दन माळी, १६) श्री. कौस्तुभ जनार्दन माळी, १७) श्रीमती मैना बाबू कुडावकर, १८) श्री. गजानन बाबू कुडावकर, १९) श्रीमती चंद्रभागा रघुनाथ जितेकर, २०) श्रीमती भिमाबाई बळीराम पाटील, २१) श्रीमती द्रोपदी विश्वनाथ गायकवाड, २२) श्रीमती नर्मदा रामचंद्र दमडे, २३) श्रीमती गंगाबाई रोहिदास पाटील, २४) श्रीमती ज्योत्सना उर्फ जनाबाई धर्मा पाटील | -- |
| ३ | करंजाडे ७२५ | कोपर -१२३ | १५/६<br>३५/६ | ०-१६-९ | १५० चौ.मी. | **नोड - उलवे भूखंड क्र. ११D, सेक्टर-२२, क्षेत्र १४९.६९ चौ.मी.** | **श्री. रामा नामा पाटील** | निरंक |
| | | | | ०-१६-९ | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिद्धी झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-** **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**सिडको भवन, तळ मजला,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/१७२/२०२५-२६

# भारताचा पाकिस्तान विरूद्धचा सामना रद्द

## ● धवन, पठाण बंधू, हरभजन यांचा बहिष्कार ●आयोजकांनी मागितली माफी

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

**इंग्लंडमध्ये १८ जुलैपासून वर्ल्ड चॅम्पियनशीप ऑफ लिजंड्स २०२५ ही स्पर्धा सुरू झाली आहे. या स्पर्धेत रविवारी (दि.२०) बर्मिंगहॅममधील एॅजबॅस्टन क्रिकेट ग्राऊंडवर भारत आणि पाकिस्तान सामना होणार होता. मात्र, सामन्याच्या काही वेळापूर्वी हा सामना रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अनेक भारतीय खेळाडूंनी या सामन्याकडे पाठ फिरवली आहे. यामध्ये शिखर धवन, इरफान पठाण, युसूफ पठाण, हरभजन सिंग यांसारख्या खेळाडूंचा समावेश आहे. एप्रिलमध्ये झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ भारतीय खेळाडूंनी या सामन्यावर बहिष्कार टाकला आहे. यानंतर स्पर्धे च्या आयोजकांकडून अधिकृत निवेदनही जाहीर करण्यात आले आहे.**



२२ एप्रिलला जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाला होता. यामध्ये २६ नागरिकांचे प्राण गेले होते. प्रत्युत्तरात भारतीय सेनेने ऑपरेशन सिंदूरच्या अंतर्गत पाकिस्तानमधील दहशतवादी तळावर हल्ला केला होता. त्यानंतर दोन्ही देशातील तणाव वाढला होता आणि युद्धजनक परिस्थितीही उद्भवली होती. याच पार्श्वभूमीवर अनेकांनी भारत-पाकिस्तान यांच्यात कोणतेही सामनेही खेळवले जाऊ नये, असे म्हटले होते. या परिस्थिततही डब्लूसीएल स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान सामना आयोजित करण्यात आला होता. त्यामुळे या सामन्यावर सर्वांचेच लक्ष होते. मात्र, सामन्यापूर्वी शिखर धवननेही सोशल मीडियावर पोस्ट करत तो या सामन्यावर बहिष्कार टाकत असल्याचे म्हटला होता. त्यानंतर काही तासांमध्येच हा सामनाच रद्द करण्यात आला आहे. बॉलीवूड अभिनेता अजय देवगण या स्पर्धेचा सहमालक आहे. या स्पर्धेत भारत, पाकिस्तानसह, दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, वेस्ट इंडिज यांसारखे संघही सहभागी झाले आहेत. निवृत्ती घेतलेले अनेक दिग्गज खेळाडू खेळताना या स्पर्धेत पाहायला मिळत आहेत.

### आयोजकांकडून स्पष्टीकरण

स्पर्धेच्या आयोजकांकडूनही घडलेल्या प्रकरणाबाबत स्पष्टीकरण देण्यात आले आहे. त्यांनी म्हटले की, पाकिस्तान हॉकी संघ या वर्षी भारतात येणार असल्याची बातमी ऐकली. तसेच, भारत-पाकिस्तान यांच्यात नुकताच व्हॉलिबॉलचा सामना झाला होता. याशिवाय अन्य काही खेळांमध्ये हे दोन संघ आमने सामने होते. हे पाहिल्यानंतर आम्हाला वाटले की, डब्लूसीएल मध्येही भारत-पाकिस्तान सामना होऊ शकतो. आम्हाला फक्त जगभरातील लोकांमध्ये आनंदी आठवणी तयार करायच्या होत्या. परंतु, या प्रयत्नात आम्ही अनेकांच्या भावना दुखावल्या. त्यामुळे अप्रत्यक्षपणे त्यांच्याकडून भारतीय खेळाडूंनाही दुखावले गेले. आता त्यांनी भारत-पाकिस्तान सामना रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. पुढे आयोजकांनी माफीही मागितली आहे.

### मुख्य प्रायोजकांचीही माघार

डब्लूसीएल या स्पर्धेचे मुख्य प्रायोजक इझीमायट्रीप.कॉम यांनीही याबाबत अधिकृत निवेदन जाहीर करत पाकिस्तानच्या कोणत्याही सामन्यासाठी सहकार्य करणार नसल्याचे म्हटले आहे. त्यांनी म्हटले आहे की, दोन वर्षांपूर्वी जरी आम्ही वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लिजेंड्स स्पर्धेसोबत ५ वर्षांचा करार केलेला असला, तरी आमची भूमिका नेहमीच स्पष्ट होती. पाकिस्तान सहभागी असलेल्या कोणत्याही सामन्याशी इझीमायट्रीप.कॉमचा संबंध असणार नाही. आम्ही इंडिया चॅम्पियन्स संघाला समर्थन देत असून त्यांच्यापाठीमागे ठामपणे उभे आहोत.

## निवडक

### स्पेनची उपांत्य फेरीत धडक



**बर्न :** महिला युरो २०२५ फुटबॉल स्पर्धेच्या उपांत्य फेरीत विश्वविजेत्या स्पेनने यजमान स्वित्झर्लंडचा २-० ने पराभव करत दिमाखात प्रवेश केला आहे. या पराभवासह घरच्या मैदानावर हजारो चाहत्यांच्या साक्षीने खेळणाऱ्या स्वित्झर्लंडचा स्पर्धेतील स्वप्नवत प्रवास उपांत्यपूर्व फेरीतच संपुष्टात आला आहे. वांकडॉर्फ स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात सुरुवातीपासूनच स्पेनने आक्रमक खेळ केला. मात्र, स्वित्झर्लंडच्या मजबूत बचावामुळे त्यांना गोलसाठी उत्तरार्धापर्यंत वाट पाहावी लागली. सामन्याच्या उत्तरार्धात पाच मिनिटांच्या अंतराने केलेल्या दोन गोलनी स्पेनचा विजय निश्चित केला. बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरलेल्या अथिनिया डेल कॅस्टिलोने ६६व्या मिनिटाला गोल करत स्पेनला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर अवघ्या पाच मिनिटांनी, ७१व्या मिनिटाला क्लॉडिया पिनाने डी-बॉक्सच्या बाहेरून एक अप्रतिम गोल करत स्पेनची आघाडी २-० अशी वाढवली. विशेष म्हणजे, स्पेनने या सामन्यात दोन पेनल्टी किक गमावल्या. सामन्याच्या ९व्या मिनिटाला मॅरिओना कॅल्डेन्टे तर ८८व्या मिनिटाला लेक्सिया पुटेलास पेनल्टीवर गोल करण्यात अपयशी ठरल्या. याशिवाय स्पेनचे तीन प्रयत्न गोलपोस्टला लागून वाया गेले. स्वित्झर्लंडच्या खेळाडूंनी शेवटपर्यंत कडवी झुंज दिली; परंतु, विश्वविजेत्या संघापुढे त्यांची कामगिरी तोकडी पडली. आता उपांत्य फेरीत स्पेनचा सामना फ्रान्स किंवा जर्मनी यांच्यातील विजेत्या संघाशी होणार आहे.

### बुद्धिबळ स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**आगरदांडा :** जय श्रीराम बुद्धिबळ प्रेमी संघटना, जय श्रीराम नागरी पतसंस्था तसेच मुरुड व रायगड जिल्हा बुद्धिबळ असो. यांच्या संयुक्त विद्यमाने नांदगाव येथील माळी समाज सभागृहात बुद्धीबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्ह्यातील १०३ स्पर्धकांनह बुद्धिबळाच्या पटावर आपले बुद्धि चातुर्य दाखवत स्पर्धे चे आव्हान कायम ठेवले. स्पर्धेदरम्यान दिलीप पाटील यांनी, मुरुड तालुक्यात प्रथमच आयोजित केलेल्या बुद्धिबळ स्पर्धेला जिल्ह्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने आयोजकांचा आत्मविश्वास दुणावला असल्याचे मनोगत व्यक्त करताना सांगितले. यावेळी जयश्रीराम नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष दिलीप जोशी, संचालक सुनिल विरकुड, गणेश ठोसर, सिद्धेश गद्रे, डॉ. संजय पाटील, सुशिल गुरव, नांदगाव सरपंच अल्पा ताई घुमकर, विद्याधर चोरघे, प्रभाकर गाणार, मंगेश कमाने, रमेश पाटील, मयुरेश गद्रे, जनार्दन पुगावकर, मुख्य पंच अर्थव दातार व संजय ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेतील खुल्या गटात समनिल गुरव प्रथम क्रमांक, वेदांत मेहता द्वितीय क्रमांक व आयन दावणे याने तृतीय क्रमांक पटकावला आहे. तर, १६ वर्षाखालील गटात अर्थव वाघ प्रथम क्रमांक, गौतम पवार द्वितीय क्रमांक व आयुष पाटील याने तृतीय क्रमांक पटकावला आहे. तसेच, मुलींच्या खुल्या गटात अरुणा मयेकर तर १६ वर्षाखालील गटात नूपूर जमनू या पदकाच्या मानकरी ठरल्या आहेत.

### अर्जुनचा 'ग्रँड' प्रवास संपुष्टात

**लास वेगास :** अमेरिकन खेळाडू लेवोन अरोनियनकडून भारतीय ग्रँडमास्टर अर्जुन एरिगसीचा २-० असा पराभव झाला. त्यामुळे फ्रीस्टाइल बुद्धीबळ ग्रँड स्लॅममधील त्याचा स्वप्नवत प्रवास संपुष्टात आला आहे. त्याने चुकीच्या चाली करून विजयाची संधी गमावली.



स्पर्धेच्या इतिहासात उपांत्य फेरी गाठणारा अर्जुन पहिला भारतीय खेळाडू ठरला होता; मात्र, अरोनियनविरुद्धच्या लढतीत तो आपल्याकडील संधींचा पुरेसा फायदा घेऊ शकला नाही. अर्जुनने सुरुवातीच्या फेरीतील प्लेऑफमध्ये मॅग्नस कार्लसनचा पराभव करीत अंतिम चारमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर उपांत्यपूर्व फेरीत हिकारू नाकामुरावर मात केली होती; मात्र, उपांत्य फेरीतील पहिल्या डावात चांगली स्थिती असतानाही तो विजय मिळवू शकला नाही. अरोनियनने आव्हान कठीण होत असतानाही संयम गमावला नाही. याउलट अर्जुनने मिळालेल्या संधी गमावल्या. दुसऱ्या डावात अरोनियनला फक्त बरोबरीची गरज होती. त्याने सुरुवातीलाच थोडा फायदा मिळवत खेळात संयम दाखवला. सामना बरोबरीकडे झुकत असतानाही, विजयासाठी आक्रमक खेळी करणाऱ्या अर्जुनने काही धोकादायक निर्णय घेतले आणि त्याचा त्याला मोठा फटका बसला.



### किवींनी उडवला झिम्बाब्वेचा धुव्वा

**नवी दिल्ली :** दक्षिण आफ्रिकेचा पराभव करणाऱ्या न्यूझीलंडने आज यजमान झिम्बाब्वेचा ८ विकेट आणि ३७ चेंडू राखून पराभव करत तिरंगी टी-२० मालिकेच्या अंतिम फेरीत धडक मारण्याच्या दिशेने धाव घेतली आहे. या मालिकेत प्रत्येक संघ चार सामने खेळणार आहे आणि झिम्बाब्वेची कामगिरी पाहता या स्पर्धेचा अंतिम सामना न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातच खेळला जाणार हे स्पष्ट दिसतेय. झिम्बाब्वेच्या १२१ धावांचा पाठलाग करताना न्यूझीलंडच्या फलंदाजांना फार कष्ट पडले नाही. टीम सिफर्ट (३) लवकर बाद झाला. मात्र त्यानंतर डेव्हन कॉन्वेने ४० चेंडूंत ५९ धावा ठोकताना रचिन रवींद्रसह (३०) ५९ धावांची तर डॅरिल मिचेलसह (नाबाद २६) ५८ धावांची अभेद्य भागी रचत संघाला १४ व्या षटकांतच विजय मिळवून दिला.

## हम्पीची उपांत्य फेरीकडे वाटचाल

**। जॉर्जिया । वृत्तसंस्था ।**

भारतीय ग्रँडमास्टर कोनेरू हम्पीने महिला विश्वकरंडक बुद्धीबळ स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीच्या पहिल्या डावात चीनच्या युशिन साँगवर मात करीत उपांत्य फेरीकडे भक्कम वाटचाल केली आहे. हम्पीने इंग्लिश ओपनिंगमध्ये काळ्या मोहरांनी खेळणाऱ्या चीनी खेळाडूविरुद्ध सुरुवातीपासूनच आघाडी घेतली हसेतर. खेळ जसजसा पुढे गेला तसतसे तो कॅटलन ओपनिंगच्या रचनेसारखा झाला आणि हम्पीची डावावरची पकड स्पष्ट दिसू लागली. डावाच्या मध्यावर आक्रमण करीत हम्पीने एका प्याद्याचा बळी देत काळ्या मोहरांच्या बचावावर हल्ला केला. त्यानंतर साँगला सावरता आले नाही. आणखी एका प्याद्याच्या चालीनंतर हम्पीने



निर्णायक वर्चस्व मिळवले आणि साँग दोन प्यादी गमावून बसली. चिनी खेळाडूने चमत्काराची आशा ठेवत लढा सुरू ठेवला; परंतु, ५३ चालीनंतर डाव संपला.

## बॉल आऊटची पुनरावृत्ती

**लंडन :** वर्ल्ड चॅम्पियन्स ऑफ लिजेंड्स स्पर्धेत शनिवारी झालेला दक्षिण आफ्रिका चॅम्पियन्स विरुद्ध वेस्ट इंडीज चॅम्पियन्स यांच्यातील सामना ऐतिहासिक ठरला. पावसामुळे ११-११ षटकांपर्यंत मर्यादित करण्यात आला. वेस्ट इंडीजने ७९ धावा केल्या. साउथ आफ्रिकेने सामना बरोबरीत सोडला. त्यामुळे २००७ नंतर प्रथमच बॉल आऊट पद्धतीने निर्णय घेण्यात आला. दक्षिण आफ्रिकेकडून जेजे स्मट्स आणि वेन पार्नेल यांनी सलग दोन हिट्स करून संघाला २-० अशी आघाडी मिळवून दिली. वेस्ट इंडीजला अपयश आल्यामुळे आफ्रिकेने हा सामना जिंकला.

## अंशुल कंबोजची भारतीय संघात एन्ट्री

**। मँचेस्टर । वृत्तसंस्था ।**

भारत आणि इंग्लंड संघात २३ जुलैपासून मँचेस्टरला चौथा कसोटी सामना खेळवला जाणार आहे. अर्शदीप सिंग दुखापतीमुळे इंग्लंडविरुद्ध चौथ्या कसोटीतून बाहेर पडला आहे. त्याच्या जागी भारतीय संघात २४ वर्षीय वेगवान गोलंदाजाला सामील करण्यात आले आहे.

भारत आणि इंग्लंड संघात सध्या अँडरसन-तेंडुलकर चषक ही ५ सामन्यांची कसोटी मालिका सुरू आहे. या मालिकेतील पहिले तीन सामने पूर्ण झाले असून तिन्ही सामने रोमांचक झाले होते. तीन सामन्यांनंतर इंग्लंड २-१ अशा फरकाने आघाडीवर आहे.



त्यामुळे उर्वरित दोन सामन्यांत भारतासमोर मालिका वाचवण्याचे आव्हान आहे. मात्र, चौथ्या सामन्यापूर्वीच भारतीय संघाला मोठे धक्के बसले आहेत. संघाचे दोन वेगवान गोलंदाज जखमी आहेत. अशात आता इंग्लंड दौऱ्यावर २४ वर्षीय वेगवान गोलंदाजाला भारतीय संघाने कव्हर म्हणून बोलावले आहे. आयपीएल २०२५ मध्ये चेन्नई सुपर किंग्सकडून खेळलेला हरियाणाचा वेगवान गोलंदाज अंशुल कंबोज भारतीय संघात आगामी दोन कसोटी सामन्यांसाठी सामील झाला आहे. त्याला दुखापतग्रस्त अर्शदीप सिंगच्या जागेवर कव्हर म्हणून संघात सामील करण्यात आले आहे. अर्शदीप सिंगला गुरुवारी सरावावेळी साई सुदर्शनने मारलेला चेंडू आडवताना डाव्या हाताला दुखापत झाली. त्याला चेंडूने कापल्याने टाके पडले आहेत. तो ज्या हाताने गोलंदाजी करतो, त्याच हाताला त्याला टाके पडल्याने तो किमान चौथ्या सामन्यासाठी उपलब्ध असणार नाही.

## जिल्ह्यातील १६८ कॅरम खेळाडूंचा सहभाग

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

स्व.नथुरामभाऊ पाटील यांच्या जयंती निमित्ताने कॅरमदिन म्हणून रायगड जिल्हा कॅरम असोसिएशन व झुंझार युवक मंडळ पोयनाड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचा शुभारंभ अलिबाग तालुक्यातील पोयनाड येथील जय मंगल हॉल येथे करण्यात आला. या स्पर्धेत जिल्ह्यातील १६८ कॅरम खेळाडूंनी सहभाग घेतला आहे.



रायगड जिल्ह्यातील सर्व विभागाच्या खेळाडूंनी पुरुष एकेरी कॅरम स्पर्धेसाठी सहभाग घेतला असल्याने स्पर्धेला रंगत येणार आहे. स्पर्धेच्या विजयी व उपविजयी खेळाडूंना झुंझार युवक मंडळाचे माजी अध्यक्ष पै.अन्वर बुराण यांच्या स्मरणार्थ अनुक्रमे रोख रक्कम ७ हजार व ५ हजार रुपये आणि आकर्षक चषक बक्षिस म्हणून देण्यात येणार आहे. दोन दिवसीय आयोजित कॅरम स्पर्धा पाहण्यासाठी पोयनाड विभागातील कॅरम प्रेमींनी गर्दी केली आहे. या स्पर्धेतील उद्घाटनाच्या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष गिरीष तुळपुळे, सचिव दिपक साळवी, कार्याध्यक्ष प्रदीप वाईंगडे, खजिनदार वैभव पेठे, सदस्य पांडुरंग पाटील, झुंझार युवक मंडळचे सचिव किशोर तावडे, क्रीडाप्रमुख नंदकिशोर चवरकर, अजय टेमकर व ॲड. पंकज पंडित आदी उपस्थित होते.

## चॅम्पियन्स लीगचे पुनरागमन

**नवी दिल्ली :** चॅम्पियन्स लीग टी-२० परत येणार आहे. अलिकडेच त्याबद्दल एक रिपोर्ट समोर आला आहे. यासोबतच, सीएलटी-२०च्या वेळेची माहितीही समोर आली आहे. चॅम्पियन्स लीग शेवटची २०१४ मध्ये खेळवली गेली होती. आता वर्षानुवर्षे वाट पाहिल्यानंतर विविध देशांतील टी-२० फ्रँचायझी पुन्हा या स्पर्धेत खेळताना दिसतील. सिंगापूरमध्ये सुरू असलेल्या आयसीसी बैठकीत अनेक वेगवेगळ्या देशांनी चॅम्पियनशिप लीग टी-२० च्या पुनरागमनाला पाठिंबा दिला आहे. २००८ मध्ये पहिल्यांदा ही लीग सुरू करण्यात आली आणि २०१४ मध्ये ती बंद करण्यात आली. सप्टेंबर २०२६ मध्ये चॅम्पियन्स लीग परत आणावी अशी चर्चा झाली असून ही लीग परत आली आहे. त्यामुळे चाहत्यांना पुन्हा त्यांच्या आवडत्या खेळाडूंना आयपीएल संघाच्या जर्सीमध्ये पाहायला मिळणार आहे.

## शमीला पुनरागमनासाठी देशांतर्गत आधार

**। कोलकाता । वृत्तसंस्था ।**

आयपीएलनंतर क्रिकेटपासून दूर असलेला वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीला पुनरागमनासाठी आता देशांतर्गत स्पर्धांचाच आधार घ्यावा लागणार आहे. बंगाल क्रिकेट संघाच्या आगामी देशांतर्गत हंगामासाठी जाहीर करण्यात आलेल्या ५० संभाव्य खेळाडूंच्या यादीत शमीचा समावेश करण्यात आला आहे.

क्रिकेट असोसिएशन ऑफ बंगालने प्रसिद्ध केलेल्या या यादीत वेगवान गोलंदाज आकाश दीप आणि आघाडी फळीतील फलंदाज अभिमन्यू इस्वरन यांचाही समावेश आहे. हे दोघे सध्या भारतीय संघासोबत इंग्लंड दौऱ्यावर आहेत. शमीचा समावेश हंगामाच्या सुरुवातीला होणाऱ्या दुलीप ट्रॉफी स्पर्धेत पूर्व विभागाच्या संघात होण्याची शक्यता आहे. या स्पर्धेला यंदा पुन्हा पारंपरिक आंतरविभागीय स्वरूपात २८ ऑगस्टपासून सुरुवात होणार आहे. ही स्पर्धा शमीसाठी स्पर्धात्मक क्रिकेटमध्ये पुनरागमन करण्याचा एक महत्त्वाचा टप्पा ठरू शकते.



### आशिया ज्युनियर मिश्र सांघिक स्पर्धा | बॅडमिंटन संघ उपांत्य फेरीत दाखल

## भारताची अमिरातीवर सहज मात

**। सोलो । वृत्तसंस्था ।**

**भारताने संयुक्त अरब अमिराती संघाचा ११०-८३ असा पराभव करीत आशिया ज्युनियर बॅडमिंटन मिश्र सांघिक अजिंक्यपद स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. 'ड' गटात समावेश असलेल्या भारताने श्रीलंकेवर एकतर्फी विजय मिळवून स्पर्धेला आश्वासक सुरुवात केली होती. हाँगकाँगनेदेखील दोन्ही सामने जिंकले असून, भारत आणि हाँगकाँग या दोन्ही संघांनी गटातून बाद फेरीत स्थान मिळवले आहे. आता रविवारी भारत आणि हाँगकाँग यांच्यात गटातील अव्वल स्थानासाठी निर्णायक लढत पार पडणार होती.**



या अजिंक्यपद स्पर्धेत रिले गुणांकन पद्धत वापरण्यात आली आहे. त्यानुसार १० सामन्यांत एकूण ११० गुण मिळवणारा संघ विजेता ठरतो. अमिरातीविरुद्धच्या लढतीत भारताची सुरुवात दमदार झाली. मुलींच्या एकेरीत रुजुला रामूने मायशा खानला ११-५ने पराभूत केले. त्यानंतर मिश्र दुहेरीत सी. लालरामसंगा आणि तारिणी सूरी या जोडीने भारताचे आघाडीचे गुण २२-११ पर्यंत नेले. अमिराती संघाकडून काही सामन्यांत चुरशीचा प्रयत्न झाला तरीही भारताने आघाडी कायम राखली. मध्यांतराला भारत ५५-४१ अशा आघाडीवर होता. यूएस ओपनची उपविजेती तन्वी शर्मा हिने माधुमिता सुंदरपंडियनविरुद्ध शानदार खेळी करीत भारताचे गुण ६६-४६ वर नेले.

लालरामसंगाने मिश्र दुहेरीत रेसिकासोबत खेळताना अदित्य किरण आणि मायशा खान यांच्यावर ११-५ने विजय मिळवून भारताचे गुण ७७-५१ वर नेले. त्यामुळे भारताचा विजय जवळपास निश्चित झाला. भारताने मिश्र संघ प्रकारात आपले सर्वोत्तम यश २०११मध्ये ब्राँझ पदक जिंकून मिळवले होते. मात्र गतवर्षी भारतीय संघ उपांत्यपूर्व फेरीत मलेशियाविरुद्ध २-३ असा पराभूत झाला आणि पदकाच्या शर्यतीतून बाहेर पडला होता.

### १७ संघांचा सहभाग

या वर्षीच्या स्पर्धेत १७ संघ सहभागी झाले आहेत. त्यांची चार गटांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. तीन गटांत प्रत्येकी तीन संघ असून, एका गटात पाच संघ आहेत. प्रत्येक संघ गटातील इतर सर्व संघांविरुद्ध एकदाच खेळतो. प्रत्येक गटातील पहिले दोन संघ उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्र ठरतील.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०१ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)